परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १३४ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०२३

Website : www.marathepratishthan.org

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

मंडळी वैशाख-वणव्याच्या उन्हाने आपण हैराण झालो आहोत. धरणीमाता तापली आहे. सूर्यनारायण आग ओकतो आहे. तापदायक वातावरण अगदी नकोसे झाले आहे. उन्हाच्या झळा असह्य होत आहेत. उष्माघातामुळे जीव दगावत आहेत. पर्यावरण अभ्यासक सारखे चेतावणी देत आहेत की झाडे लावा, झाडे जगवा. पृथ्वीचे तापमान त्यामुळे कमी होईल. पण आपण त्याकडे दुर्लक्ष करीत आहोत. मानवाच्या हिताची कोणतीच गोष्ट आपण गंभीरपणे मनावर घेत नाही. त्यावर कारवाई करणे तर दूरच ही खेदाची गोष्ट आहे. असो.

मंडळी, वाईट वाटावी अशी घटना म्हणजे आपल्या इंदुरच्या कुलभगिनी थोर दत्तभक्त सौ. शुभदा रविंद्र मराठे यांचे दि. १६ मे २०२३ द्वादशीला इंदुर येथे अहेवपणी निधन झाले. श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत, मूळ ग्रंथ रचियला. श्री शंकर भट्ट यांच्या महान ग्रंथाचा संशोधित मराठी अनुवाद सौ. शुभदाताईंनी खूप परिश्रम घेऊन अतिशय उत्तमरित्या केला आहे. त्यांना या कामी प.पू. श्री सज्जनगड रामस्वामी शिष्या (पंढरपूर) सौ. स्वाती देशपांडे, भाटकर (मुंबई) यांची मदत झाली. सौ. शुभदाताई या प.पू. नानामहाराज तराणेकर यांच्या शिष्या होत्या. श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत ग्रंथानुवाद करताना शुभदाताईंना त्यांचे काका श्री. मनोहर जोशी (प.पू. नाना महाराज तराणेकर यांचे अनुग्रहित) तसेच शुभदाताईंचे पती श्री. रविंद्र मराठे, जावई आणि मुलगी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. श्रीपादप्रभूंचे हे दिव्य चरित्र लिहून सौ. शुभदाताई भवसागर पार करून प्रभुचरणी लीन झाल्या आहेत. त्यांना जो कृपाप्रसाद मिळाला तो समस्त मराठे परिवाराला मिळावा अशी गुरुचरणी प्रार्थना करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहते. असो.

मंडळी, दहावी-बारावी, पदवी परिक्षांचे निकाल लागले आहेत. या परिक्षांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन. या विद्यार्थ्यांसाठी मराठे प्रतिष्ठानने भरघोस पारितोषिके ठेवली आहेत. तरी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांनी गुण पत्रिकेची प्रत इ-मेलने प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पाठवावी ही नम्र विनंती करते. (admin@marathepratishthan.org)

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने मोठ्या उत्साहाने स्नेहमेळावा, वर्धापन दिन, कर्नल प्रमोदन मराठे यांचे आपल्या घरातील साहित्यापासून प्रथमोपचार कसे करता येतात यावर उपयुक्त मोलाचे मार्गदर्शन, वंशवेल या कुलवृत्तांताच्या संगणकीय प्रणालीचे प्रात्यक्षिक असे भरगच्च कार्यक्रम दणक्यात साजरे केले. या कार्यक्रमात कुलबांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही आनंदाची गोष्ट आहे. अध्यक्ष श्री. विजय मराठे, कार्यवाह सौ. मानसी (रश्मी) मराठे गाडगीळ, सौ. अंजली, संजय, चंद्रशेखर, अश्विनी, प्राजक्ता या सर्व उत्साही कार्यकर्त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे कारण या सर्वांच्या परिश्रमामुळे कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला. असो

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. १७ मे, २०२३)
भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ८४३३६७४८२७ ● इ-मेल : hitguj@marathepratishthan.org
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# पुणे शाखेचा स्नेहमेळावा

• मानसी (धनश्री) मराठे गाडगीळ, कार्यवाह (मराठे प्रतिष्ठान) पुणे शाखा

**आ**ज दिनांक १६ एप्रिल २०२३चा स्नेहमेळाव्याचा कार्यक्रम पार पडला.

कोणतेही कार्य म्हटले की त्यासाठी पूर्वनियोजन हे आलंच.

दिनांक ५ मार्च २०२३ रोजी म. प्र. पुणे शाखेचा वर्धापनदिन साजरा झाला, यावेळी नवनियुक्त कार्यकारिणीने मासिक बैठकीचे आयोजन केले. विविध कार्यक्रम करून मराठे परिवाराला कसे एकत्रित बांधता येइल याचा विचार या बैठकीत झाला आणि पुढील कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.

एप्रिल महिना उजाडला आणि ठरवलेल्या स्नेहमेळाव्याची लगबग सुरू झाली. विचारविनिमय, आभासी बैठका होऊ लागल्या. त्यामधे स्नेहमेळाव्याची रूपरेषा ढोबळमानाने ठरवण्यात आली.

त्यामागे नेहमीप्रमाणे मोठ्यांचे मोलाचे मार्गदर्शन होतेच.

नवनियुक्त सदस्यांनी (संजय, चंद्रशेखर, अश्विनी, प्राजक्ता) यांचादेखील उत्साही सहभाग होता. नेहमीप्रमाणे कार्यक्रमासाठी सदस्यांची उपस्थिती हा कळीचा मुद्दा होताच.

वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाच्या आदल्या दिवसापर्यंत निश्चित उपस्थित राहू शकणाऱ्या सदस्यांना कार्यकारिणी स्मरणसंदेश पाठवत होतीच. पूर्वानुभवानुसार वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात १२५ सदस्यांनी आपली उपस्थिती निश्चित केली असूनदेखील प्रत्यक्ष कार्यक्रमाकरिता केवळ ७५च सदस्यांनी हजेरी लावली होती.

मात्र स्नेहमेळाव्याचा स्नेह मराठे परिवारात वृद्धिंगत होत असल्याचा अनुभव कार्यकारिणीला आला जेव्हा सदस्यांनी केवळ निश्चित येण्याचे कळवलेच नाही तर प्रत्यक्षातही उपस्थिती लावली.

या कार्यक्रमाला युवापिढीचा सहभाग मात्र कौतुकास्पद होता. प्रारंभी कार्यक्रमामधे नावनोंदणीची कामगिरी सौ मंजिरी, प्राजक्ता यांनी चोख बजावली. सौ. अंजली व मानसी यांनी महिलांना हळद कुंकू, गजरे, अत्तर देऊन स्वागत केले.

'मराठे प्रतिष्ठान' पुणे शाखेतर्फे कुलबांधवांच्या भेटीगाठी, आपल्याच परिवारातील कुलबांधव व भगिनी यांची प्रत्यक्ष ओळख तसेच प्रतिष्ठान करता आपण स्वतः काय करू शकतो याचा आढावा घेण्यासाठी हा स्नेहमेळावा आयोजिला होता.

कोणतीच औपचारिकता नसलेल्या कार्यक्रमाकरता सौरभ याने उत्कृष्ट निवेदन केले. आजच्या कार्यक्रमास बरेच जुने व नवीन सभासद उपस्थित होते. विशेषतः ५०% उपस्थिती ५० वर्षे वयाच्या आतील होती, याचे श्रेय नवनिर्वाचित कार्यकारी मंडळातील सदस्यांकडून जे विशेष प्रयत्न केले गेले होते याला जाते.

सर्वश्री वा. ग. मराठे सपत्नीक, अरूण राव, कर्नल प्रमोदन सपत्नीक, श्रीकांत जी सपत्नीक (निवृत्त संचालक एआरएआय) रमेश मराठे (डिएनए विषय) विवेक मराठे, माधुरीताई मराठे (रिटायर्ड ARAI डेप्युटी डायरेक्टर) निलिमा मराठे (कथक),





आपले विश्वस्त DK (दत्तात्रेयजी), कार्याध्यक्ष विजय विष्णू, आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ सभासद उपस्थित होते.

उपस्थितांपैकी खालील व्यक्तींनी आपल्यातील कलाविष्कार सादर केला.

श्री विजय बागुल यांनी माऊथ ऑर्गन वर २ गाणी वाजवली, मंजिरी व अंजली मराठे यांनी छान गीते सादर केली.

कर्नल प्रमोदन यांनी प्रथमोपचार, आपत्कालीन परिस्थितीत नागरी जीवन कसे असावे यासंदर्भात काही विवेचन केले व ते यासंदर्भात आपणांस मार्गदर्शन करण्यास इच्छुक आहेत असे सांगितले. रमेश मराठे यांनी कोकणस्थ ब्राह्मण ज्ञातीतील डिएनए संदर्भातील विषयाचे रंजकरित्या विश्लेषण केले.

नंतर चैत्र मासाचे औचित्य साधून त्याला अनुसरून ठेवलेल्या कैरीची डाळ, ओल्या नारळाची करंजी, दडपे पोहे, थंडगार पन्हे या पदार्थांचा सर्वांनीच आस्वाद घेतला.

त्यानंतर कार्यक्रमाची ठरलेल्या वेळेत सांगता झाली.

पुढील सर्वच कार्यक्रमास असाच प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.

♦

## पुस्तक प्रकाशन



जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉक्टर गिरीश जाखोटिया यांनी लिहिलेल्या Economics of Survival ह्या पुस्तकाचे प्रकाशन लोकमान्य नगर, विलेपार्ले येथे शुक्रवार दिनांक १९ मे २०२३ रोजी सायंकाळी ६ ते ७.३० या वेळेत अतिशय नेटक्या आयोजनामध्ये संपन्न झाला. 'मराठे प्रतिष्ठान'चे कार्यवाह श्री. हेमंत मराठे हे आवर्जून उपस्थित होते. डॉ. जाखोटिया हे मराठ्यांचे जावई आहेत.

*आम्ही बिघडलो तुम्ही बिघडाना।।*
*सागराच्या संगे नदी बिघडली*
*नदी बिघडली सागराची झाली।।*
*परिसाच्या संगे लोह बिघडले*
*लोह बिघडले सुवर्णाचे झाले।।*
*सद्गुरुंच्या संगे शिष्य बिघडला*
*शिष्य बिघडला सद्गुरुची झाला।।*

**– संत तुकाराम महाराज**

## सुभाषित

**होय होय वारकरी। वाट पाहे पंढरीची।।**

**ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविणा प्रीती।**

# वंशवेल कुलवृत्तांत प्रणाली प्रात्यक्षिक सोहळा

• विजय मराठे (पृ.४१), पुणे, कार्याध्यक्ष–मराठे प्रतिष्ठान

**म**राठे प्रतिष्ठान गेली बरेच वर्ष संगणकीय कुलवृत्तांत प्रणालीच्या प्रतीक्षेत होते. याबाबतचे प्रयत्न जरी २००७ सालापासून सुरु होते तरी त्यात वेळोवेळी अडचणी येत गेल्या. अखेरीस २०१८ मध्ये ह प्रकल्प पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी तत्कालीन अध्यक्ष कै. रमाकांतजी विद्वांस यांनी या प्रकल्पाविषयी उत्साही असलेले आणि संगणक क्षेत्राशी जवळून संबंध असलेले प्रतिष्ठानचे तत्कालीन कोषाध्यक्ष श्री. श्रीनिवास मराठे यांच्यावर सोपवली.

त्यांनी लगेचच कामाला सुरुवात केली आणि कुळातील १०११२ पुरुष व्यक्तींची नावे, त्यांचे आपसातील पितापुत्र संबंध, त्यांची निवासस्थाने, जन्म मृत्यू वर्षे, त्यांच्या पत्नी, पुत्र आणि कन्या यांची संख्या आदि महत्वाची माहिती EXCEL File मध्ये गठीत केली. तत्कालीन उपलब्ध १/२ वगळता कुठल्याही Online कुलवृत्तांतांत वंशावळी नव्हत्या. आपल्या १९९२ साली प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तांताच्या अखेरीस तर त्याकाळी संगणक प्रचलित नसतांना देखील शैक्षणिक तसेच व्यावसायिक माहितीचं पृथक्करण प्रसिद्ध केलं होतं. नव्या संगणक प्रणालीत वंशावळी तर हव्याच पण शिवाय अशा बऱ्याच गुणधर्माधारित विश्लेषण/ पृथक्करण/ वर्गीकरण आवश्यक असण्याच्या श्री. श्रीनिवास यांच्या आग्रहामुळे त्यावेळी उपलब्ध प्रणाली आहेत तशा स्वीकारणे शक्य नव्हते.

२०१९च्या एप्रिल महिन्यात एका Developer ने अशी प्रणाली बनविण्याची तयारी दर्शवली. त्याच्याकडून इच्छित गतीने काम न होण्यात प्रणाली परिपूर्ण असण्याविषयी श्रीनिवास यांचा आग्रह हेही एक कारण होते. त्यामुळे २०२० ऑक्टोबर/ नोव्हेंबरमध्ये अखेर नव्या Developer चा शोध सुरू झाला. मार्च २०२१ मध्ये दुसऱ्या Developer कडे ही जबाबदारी दिली गेली. मात्र त्यांच्या अतिव्यस्ततेमुळे पुनः प्रकल्पाची गती मंदावली आणि अखेर मार्च २०२२ रोजी पुनः 'ये रे माझ्या मागल्या' अशी परिस्थिति आली. त्यानंतर वंशावळ बनवता येण्याची खात्री करून घेऊन पुण्यातील एक डेवलपर Bluepearl Biotechचे श्री. संतोष तेलवणे यांच्यावर ही कामगिरी सोपवली. त्यांनी विक्रमी वेळात म्हणजे मे २०२३ ते डिसेंबर २०२३ पर्यन्त जवळपास ९०% काम पूर्ण केले. त्यानंतर Testing साठी सुमारे



१/२ महीने गेले. त्यानंतर छापील कुलवृत्तांतातील माहिती या प्रणालीत भरण्याचे मुख्य काम ७ व्यक्ति गेले ३ महीने करीत आहेत आणि ते काम पूर्ण होईपर्यंत जून अखेर उजाडणार आहे. तसेच काही उणीवा राहिल्या आहेत त्या दूर करून ही प्रणाली मराठे कुल बंधुभगिनींसाठी जून अखेरीस उपलब्ध होऊ शकेल अशी माहिती श्री. श्रीनिवास यांनी यावेळी दिली.

या प्रणालीचे 'वंशवेल' असं अत्यंत संयुक्तिक नामकरण करण्यात आलं आहे. या 'वंशवेल' संगणकीय कुलवृत्तांत प्रणालीचे प्रात्यक्षिक 'मराठे प्रतिष्ठान' पुणे कार्यकारिणीद्वारे रविवार दि.४ जून २०२३ रोजी शाकुंतल कलामंदिर मयुर कॉलोनी, कोथरूड येथे उत्साहात सादर झाले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे चितपावन ज्ञातीतील सुमारे १२ कुळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत थंडगार पन्हे देऊन झाले आणि नंतर प्रास्ताविक 'मराठे प्रतिष्ठान'चे कार्याध्यक्ष विजय मराठे यांनी केले. त्यानंतर या प्रकल्पाचे सर्वेसर्वा श्री. श्रीनिवास अनंत यांनी या प्रकल्पामागची भूमिका आणि सुरुवातीपासून त्यांत आलेल्या अडचणी आणि त्यावर झालेले विचारमंथन आणि अखेरीस त्या प्रकल्पाची आपले सहकारी सौरभ, धनंजय, माधव आणि प्रसाद या आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने केलेली यशस्वी पूर्तता या बाबत थोडक्यात विवेचन केले.

प्रात्यक्षिकाचे वेळेस सौरभ यांनी ही प्रणाली म्हणजे Online कुलवृत्तांत कसा उपयोगी आहे याचे विस्तृत विवेचन केले. सद्यपरिस्थितीत कुलवृत्तांत छापील स्वरूपात प्रकाशित करणे हे अवघड तसेच खुपच खर्चिक आहे. त्यामुळे संगणकीय कुलवृत्तांत हा सोय आणि खर्च या दोन्ही निकषांवर एकमेव पर्याय कसा होऊ शकतो या बाबतही चर्चा झाली. तसेच कुलवृत्तांतातील माहितीची सुरक्षा आणि प्रणालीविषयी संपूर्ण तांत्रिक माहिती श्री. संतोष यांनी दिली. तद्नंतर उपस्थित कुळातील व्यक्ति आणि आपले मराठे कुलबांधव यांच्या सर्व प्रश्न आणि शंका यांचे निरसन सौरभ आणि श्रीनिवास यांनी केले आणि कार्यक्रमाचा समारोप उपस्थितांना फराळाचा बॉक्स देऊन झाला.

♦

---

# संस्कार

**ए**क साधा लोखंडी तुकडा - किंमत शून्य. केरात टाकला जातो.

भंगारवाला त्या पूर्ण तुकड्याचे २ देतो. पुढे त्या तुकड्यावर योग्य ते तांत्रिक संस्कार करून त्यातून १०० सुया तयार होतात. प्रत्येक सुई २. किंमत २००.

थोडा मोठा तुकडा असेल तर विळी किंवा अन्य काही छोटं गृहोपयोगी साधन. किंमत ५० ते २००.

याच प्रमाणात जितका मोठा तांत्रिक संस्कार, तितकी किंमत जास्त.

अगदी छोटी उपकरणं, रोजच्या वापराची वाहनं, लष्करी सामुग्री, मोठमोठ्या कारखान्यांतील यंत्राचे सुटे भाग, विमानाचे, प्रचंड मोठ्या जहाजांचे सुटे भाग.

किती ठिकाणी हे संस्कारित लोखंड वापरलं जात असेल.

निर्जीव लोखंड! पण संस्कारांच्या प्रभावाने त्याची किंमत कितीतरी वाढते. रोज आपण वापरत असलेल्या कितीतरी - जवळ जवळ सगळ्याच - वस्तू अशाच वेगवेगळ्या कच्च्या मालावर केलेल्या संस्कारांतून घडलेल्या असतात.

जसा कच्चा माल, त्यानुसार संस्कार.

पण फलित एकच. सुंदर, सुबक, सुघड, जीवनोपयोगी उत्पादन.

मग हाडामांसाचा माणूस योग्य धार्मिक, सामाजिक, नैतिक संस्कारांनी घडवायचा प्रयत्न केला तर तो किती मूल्यवान होईल?

कामातून विरंगुळा हवा पण तो विरंगुळा आपल्यावर हुकमत गाजवणार नाही यासाठी सावध राहायला हवं, सगळ्यांनीच.

मूर्ख, अर्ध्या-मुर्ध्या, विकृत कथांवर विसंबून आपल्या अमूल्य सांस्कृतिक ठेव्यावर अविश्वास दाखवला तर आयुष्याचं मातेरं नक्की.

जसं आणि जितकं जमेल,
तसं आणि तितकं...
पण धार्मिक मूल्यशिक्षणाला पर्याय नाहीच.

**राधा मराठे**
९.५.२०२३

## आरोग्य धन संपदा

**विविध विकारांवर उपयुक्त औषधी वनस्पती.**

पडसे, खोकला, ताप, तुळशीचा उपयोग होतो.

उष्णतेच्या विकारावर दुर्वांचा उपयोग होतो. त्वचेचे विकार, मधुमेह ह्यावर हळद, आंबे हळद, पित्त उठणे, व्रण-जखम यासाठी झेंडू, लघवीचे विकार- गवती चहा भाजणे, दमा कोरफड, स्त्रियांचे विकार यासाठी देशी जास्वंद

# माझी शाळा

♦ केयूर मानस मराठे (पृ.३४१), पुणे

**मा**धव सदाशिव गोळवलकर हे माझ्या शाळेचे नाव. मी या शाळेत इयत्ता दुसरीमध्ये शिकतो. माझ्या शाळेची स्थापना १० जून १९८५ रोजी झाली. माझी शाळा डेक्कन एज्युकेशन सोसायटीची आहे. तिचे संस्थापक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, विष्णूशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगारकर, वामन शिवराम आपटे, महादेव बल्लाळ नामजोशी व राजर्षि शाहू महाराज हे होते.

माझी शाळा सकाळी सात ते दुपार साडेबारापर्यंत असते. त्यामुळे मला सकाळी लवकर उठावे लागते. त्याचा मला कधी कधी कंटाळा येतो. पण शाळेत मित्र भेटले की मला आनंद होतो. माझ्या शाळेत खेळ, व्यायाम, अभ्यास घेतात. आमचा व्यायामाचा तास बुधवारी व शनिवारी असतो. शाळेत स्पर्धा व व्याख्याने पण असतात. आम्हाला काही वेळा भाज्या निवडायला, लसूण सोलायला, बटाटे सोलायला सांगतात. या भाज्यांची माहितीसुद्धा सांगतात. एकदा आम्हाला शाळेत भेळ पण खायला दिली होती.

माझ्या शाळेतल्या सगळ्या शिक्षिका खूप छान आहेत. त्या आम्हाला वाचन, लेखन, गायन व चित्रकला शिकवतात. त्यांच्याबरोबर आम्ही प्रकल्प दिन साजरा केला. टाकाऊ वस्तूंपासून आम्ही विविध शोभेच्या वस्तू तयार केल्या.

माझी शाळा मला खूप आवडते. शाळेत माझा वेळ छान जातो. मित्रांबरोबर गप्पा मारायला मज्जा येते. आमच्या शाळेत फरशीचे मैदान आहे. तिथे आम्ही खेळतो. तिथेच आमचे स्नेहसंमेलन होते. या वेळेस माझे आई-बाबा शाळेत आले होते.

मला शाळेत शिकून लेखक बनायचे आहे. त्यासाठी माझ्या वर्गशिक्षिका मला भरपूर पुस्तके वाचायला सांगतात. शाळेत कोणाचा वाढदिवस असला की आम्ही मुले एकमेकांना चॉकलेटऐवजी छोटी पुस्तके देतो.

आम्हाला शिस्त लागावी म्हणून आमचे शिक्षक आम्हाला कधी कधी रागावतात. पण आम्ही चांगले वागलो की शाबासकी देतात. मला गृहपाठाला छान शेरा मिळाला की खूप आनंद होतो. आमच्या ताई आमच्यावर चांगले संस्कार करतात.

मला माझ्या शाळेच्या मुख्याध्यापिका खूप आवडतात. त्या शिस्तप्रिय आहेत. त्या आमचे लाड पण करतात. आमच्यासाठी त्या छान छान कार्यक्रम आयोजित करतात. आमच्या ताईंनी जादूने प्रयोगसुद्धा आयोजित केले होते. मी शाळेत शिकून खूप मोठा होणार.

*साभार: निर्मळ रानवारा, मे २०२३*

♦



# श्री गुरुवेनमः

◆डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

**दि. ३ जुलै २०२३ ला गुरुपौर्णिमा आहे. आपल्या देशात प्राचीन काळापासून, गुरुंना वंदन करणे, त्यांची पूजा करणे, त्याची उपासना करणे अशी पवित्र परंपरा चालत आली आहे. आपल्या संस्कृतीत परमेश्वराबरोबरीनेच मातापित्यांना महत्त्व देण्यात आले आहे. मात्र गुरुला प्रसंगीच, प्रत्यक्ष परमेश्वरापेक्षाही अधिक महत्त्वाचे स्थान देण्यात आल्याचे आढळते. एकवेळ परमेश्वर प्रसन्न होऊ शकेल, परंतु गुरुकृपा लाभणे ही कठीण गोष्ट आहे असे जाणकारांनी आणि साधुसंतांनी सांगितले आहे. पुढील लेखात, वर्तमानकाळातही 'गुरुमहात्म्य' कसे प्रभावशाली असते ते विशद केले आहे.**

कॉलेजचे ते मखमली, मंतरलेले दिवस, धुंदीत जगणारे, अनोख्या मस्तीला जपणारे, स्वप्न कुरवाळणारे, आशा गोंजरणारे, स्वप्नांना भारावून टाकणारे मोरपंखी मस्त दिवस आज हरवून गेलेले तरी त्यातील स्मृति ताज्या, फुलासारख्या मागे सुगंध दरवळत ठेवणाऱ्या अशा. कॉलेजात असताना, एखाद्या ठराविक शब्दाची लाट येऊन तो शब्द इतका काही कॉलेजप्रिय (लोकप्रिय नव्हे हं!) होतो की प्रत्येक विद्यार्थ्यांच्या तोंडी तो विशिष्ट शब्द मंत्री जसा खुर्चीला चिकटलेला असतो ना तसा जिभेवर चिकटलेला असे. वारंवार त्या शब्दाचा उच्चार करून तो विशिष्ट शब्द सारखा गुळगुळीत बनत असे. उदाहरणार्थ आम्ही मित्रमैत्रिणी 'गुरु' या शब्दाचा वापर सारखा करीत असू. ग्रुपमध्ये एखाद्या मैत्रिणीला वा मित्राला, ''तू म्हणजे अगदी 'गुरू' आहेस!'' असे सहजगत्या बोलत असू! शेंगेतून बी निसटावी इतक्या सहजपणे बोलत असू.

तेव्हा त्या वयात 'गुरु' या शब्दाकडे वरवर, उथळपणे पाहात होतो. आज 'गुरु' या संज्ञेची व्याप्ती किती विशाल आहे, किती खोलवर त्याचा अर्थ आहे, गाभा आहे, 'गुरु'त केवढे सामर्थ्य आहे. जसजसा जास्त गंभीरपणे विचार करू लागू तसतशी गुरुच्या अमर्यादित शक्तीची जाणीव होते. वाचन, चिंतनाने, गुरु ही संकल्पना आधिकाधिक स्पष्ट होत जाते, गडद होते. आणि 'गुरु' अक्षरात केवढे प्रचंड सामर्थ्य आहे याची प्रचिती येते.

'गुरु' या अक्षराचा अर्थ अज्ञानाचा अंधःकार होय. गुरु या अक्षराचा अर्थ ज्ञानप्रकाश असा असून अज्ञानाचा नाश करणारे सगुण ब्रह्म म्हणजेच गुरु होय. परमतत्त्वाचा साक्षात्कार श्रीगुरुच्या कृपेशिवाय होत नसल्याने श्रीगुरुस परमेश्वरापेक्षा महत्त्व आहे. परमगुह्याचा बोध केवळ श्रीगुरुकृपेनेच होत असतो. मातापिता यांच्यापेक्षाही श्रीगुरुला महत्त्व आधिक आहे. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।' ही प्रार्थना आज सर्वतोमुखी दिसते.

जगाचे मूळकारण म्हणजे श्रीगुरु. जगातील विविध रूपे ही गुरुस्वरूपच होत. अद्वैताचा साक्षात्कार गुरुमुळेच होतो. श्रीगुरु हा आनंदस्वरूप असून जन्मरहित आहे. त्याला वृद्धत्व नाही, आदि, अंत नाही. तो सतत ज्ञानमय, आनंदमय असतो. तो अणूहून लहान व मोठ्याहून मोठा असतो. श्रीगुरु हाच खरा जगाचा स्वामी आहे. श्रीगुरु हा सर्वांचे उगमस्थान आहे. गुरुशिवाय कोणीच श्रेष्ठ नाही. गुरुगीता म्हणते श्रीगुरु फार प्रेमळ असतो, शंकर रागावला तर गुरु पाठीराखा असतो. आपले संत ही म्हणतात, 'श्रीगुरुसारिखा असतां पाठीराखा। इतरांचा लेखा कोण करी?।'

गुरुपदेशापूर्वी आणि गुरुपदेशानंतर स्वतःची भूमिका तयार करण्यासाठी म्हणून स्वतःचे गुरुत्व स्वतः करावे लागते. कारण भूमिका तयार झाल्याशिवाय गुरु भेटत नाही आणि हे स्वतःचे गुरुत्व स्वतः करण्यासाठी एक विशिष्ट दृष्टिकोन गुणग्राहकतेचा किंवा सारग्राहकतेचा स्वीकारावा लागतो तो जर स्वीकारला तर दुर्मिळ गुरु सुलभतेने प्राप्त होतो. सद्बुद्धीचे साहाय्य घेतले तर 'जगाचि असके गुरु दिसे'–

जगातील प्रत्येक अचेतन वा सचेतन वस्तूपासून, व्यक्ती पासून बोध घेता येतो. सुपापासून बोध घेता येतो की, रजःकण आणि भुसा कोंडा यांचा त्याग करून अस्सल बीज ह्दयाशी धरून ठेवावे. गुरुतत्वाचा आविष्कार श्रीदत्तात्रेयांत झालेला आहे, श्रीदत्तात्रेयांना 'श्रीगुरुदेव दत्त' असेच म्हणतात. श्री गुरुदत्तात्रेयांनी २४ गुरु केले आहेत त्यांचे विवरण एकनाथांनी भागवताच्या ७, ८, ९ या अध्यायांत केले आहे. श्रीदत्तगुरु या २४ गुरुंपासून

काय शिकले हे पाहाण्याजोगे आहे. पृथ्वीपासून क्षमा, वायूपासून अनासक्ती, आकाशापासून असंगत्व, पाण्यापासून स्वच्छता, कुमारीपासून एकाकीपणा, शिकाऱ्यापासून एकाग्रता हे गुण घेता येतील. अनात्मरती सोडून आत्मरती करण्यास पिंगला शिकवील, गृहासक्तीचे दुष्परिणाम कपोत समजून देईल तर टिटवी अपरिग्रहाचे महत्त्व समजून देईल. देहाभिमानशून्यतेचा आदर्श दाखविण्यास लहान बालक व शेवटी जीवशिवऐक्य समजून देण्यास वायू, आकाश, अग्नि, चंद्रमा, सूर्य, समुद्र, कोळी, यदृच्छलाभसंतोष शिकविण्यास 'अजगर, सर्प' हे सर्व गुरु साधकास उपकारक ठरतील आणि परमार्थाची 'तांतडी' करण्यास अनित्य देहच गुरु ठरेल.

आपल्या हिंदुधर्मांतील नाथपंथ, वारकरीपंथ महानुभावपंथ, दत्तपंथ आणि रामदासीपंथ या सर्व संप्रदायामध्ये श्रीगुरुला व गुरुपरंपरेला अतिशय महत्त्व दिलेले आहे. श्रीगुरुचे माहात्म्य सांगणाऱ्या, श्रीगुरुची थोरवी गाणाऱ्या अनेक कथा आढळतात. श्रीगुरुची महति वर्णिलेले विपुल साहित्य उपलब्ध आहे. आपल्याकडे गुरुशिष्य जोड्या प्रसिद्ध आहेत. श्रीकृष्ण-अर्जुन, द्रोणाचार्य-एकलव्य, श्रीनिवृत्तिनाथ-श्रीज्ञानेश्वर, जनार्दनस्वामी-एकनाथ, समर्थरामदास-शिवाजी महाराज, रामकृष्ण-परमहंस-स्वामी-विवेकानंद, बिष्णुबुवा जोग-सोनोपंत दांडेकर इ. कितीतरी उदाहरणे देता येतील.


त्याचप्रमाणे संगीतक्षेत्रात गायकांच्या घराण्यात गुरु-शिष्य परंपरा मोठ्या श्रद्धेने पाळतात. गुरुचा गंडा बांधून शागीर्द होऊन गानविद्या शिकण्यास मिळाल्यास शिष्याला धन्यता, कृतार्थता वाटते. नाट्यचित्रपट सृष्टीत ही कलाकार गुरुशिष्य संबंध मोठ्या प्रेमाने जपत असतात. ज्याला गुरु मिळाला त्याचे जीवन अंर्तबाह्य उजळून जाते. पूर्वजन्मीचे सुकृत असेल तर चांगला सद्गुरु लाभल्याचे भाग्य मिळू शकते.

'शिष्यात् इच्छेत् पराजयम्' अशी गुरुची अपेक्षा असते. गुरुने चांगला, उत्तम शिष्य तयार करणे महत्त्वाचे. शिष्य हा गुरुवरून ओळखता यावा. समर्थ रामदासांसारख्या गुरुंनी शिवाजी राजांत क्षात्रतेज निर्माण केले की, ज्यायोगे हिंदुपतपातशाहीचे सम्राट बनून, छत्रपतींनी स्वराज्यात आनंदवनभुवन उभे केले. शिवाजी राजांना घडविण्यात जिजामाता, रामदासस्वामी यांचा मोठा हात होता हे नाकारून चालणार नाही. गुरुचे हुबेहुब अनुकरण, सहीसही नक्कल करणे यापेक्षा शिष्याने कलेच्या क्षेत्रात वा इतर अन्य क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा, खास स्वतंत्र शैली उमटविली पाहिजे हा विचार बरोबर, पटण्याजोगा पण गुरुच्या वलयात न राहता स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी, वेगळेपणा दर्शविण्यासाठी गुरुपरंपरा आज नाकारल्या जात आहेत हे आपले दुर्दैव आहे. गुरुपरंपरा नाकारणे, गुरु न मानणे हे समाजाच्या करंटेपणाचे लक्षण आहे.

चालू जमान्यात तावून-सुलाखून निघालेला गुरू पाहिला तरी तो चांगला सद्गुरू असेलच याची खात्री देता येत नाही. किंबहुना 'ऐसे कैसे जाले भोंदुर?' अशा गुरुंचाच सुळसुळाट फार झालेला समाजात दिसतो तेव्हा अशा गुरुंपासून सावध राहाणे हिताचे व महत्त्वाचे ठरते. गुरु करताना डोळसपणा हवा. बुद्धी कोणाच्याही आहारी न जाणारी स्वयं भू हवी. आज समाजात असे चित्र आहे की चांगला वाटणारा, आदर्श असणारा माणूस हा शेवटपर्यंत तसाच चांगला राहील याची हमी देता येत नाही. माणूस हा विकत घेतला जाऊ शकतो, विकला जातो अशी प्रतिमा आज दिसते. माणूस हा स्वलनशील प्राणी आहे. त्याचे अधःपतन केव्हा होईल हे सांगता येत नाही. सुदैवाने पूर्वी आपल्याकडे जे भव्य, दिव्य. उदात्त असे गुरु होऊन गेले ज्यांच्या आदर्शत्वाला कसलीही बाधा लागली नाही. समाजमानसात ज्यांची प्रतिमा अभंग राहिली आहे असा सत्पुरुषांनी, सद्गुरुंनी दाखविलेला मार्ग चोखाळावा त्यांनी दिलेला स्वयंप्रकाश आपल्यास पुरेसा आहे!

♦

## मुकी बिचारी...



बैलगाडा शर्यतीला सर्वोच्च न्यायालयाने सशर्त मान्यता दिली. मात्र, यात बैलांचे होणारे अतोनात हाल, त्यांना होणाऱ्या शारीरिक यातना बघवत नाहीत. स्पर्धेआधी बैलांना धष्टपुष्ट बनवले जाते. त्यानंतर ऐन शर्यतीत जो तो स्पर्धक जिवाच्या आकांताने बैलांना पळवतो. या भरधाव धावण्यामुळे, काही बैलांचे पाय अडखळून ते पडतात. ते कायमचे जायबंदी होतात. काही बैलांचा गंभीर इजा होऊन मृत्यू होतो. पण याचे कोणाला सोयर-सुतक नसते. आता सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असला तरी, आयोजक नियमांचे काटेकोर पालन करतील का? शेवटी यात बैलांना प्रचंड यातना निमूट सहन कराव्या लागतात. त्यांची अवस्था 'मुकी बिचारी कुणीही हाका...' अशीच असते. ती आता बदलेल का?

– **गुरुनाथ मराठे** (पृ.४०८), बोरिवली

*साभार, महाराष्ट्र टाइम्स, २९ मे २०२३*

# शब्दखेळचा प्रकाशन सोहळा संपन्न!!!

◆ आनंद केशव मराठे, (पृ. १५६), कुर्धे रत्नागिरी

**रा**जापूर हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक श्री. आ. के. मराठे यांच्या निवडक, स्वरचित शब्दकोड्यांचा समावेश असलेल्या **शब्दखेळ** या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ काल पुणे येथे पार पडला.

गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ श्री. मराठेसर आपल्या AKM मायबोली उपक्रमांतर्गत रोज एक शब्दकोडे प्रसारित करतात. आज देश विदेशातील हजारो कोडेप्रेमी स्नेही त्यांच्या या उपक्रमाशी जोडले गेलेले असून खास लोकाग्रहास्तव श्री.मराठेसरांनी त्यांच्या स्वरचित, दर्जेदार कोड्यांचा हा खजिना त्यांच्यासमोर उघडा केला आहे.

पुण्यातील संवेदना प्रकाशनने प्रकाशित केलेले हे दुसरे पुस्तक आहे. गेल्यावर्षी प्रकाशित झालेले रंगधून हा मराठेसरांचा चित्रचारोळी संग्रह वाचकांच्या पसंतीला पडला असतानाच त्यांचे शब्दखेळ हे नवीन पुस्तक काल प्रकाशित झाले आहे.

कोडी सोडवा - आनंद मिळवा ही टॅगलाईन मोठ्या अभिमानाने मिरवणाऱ्या या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभ काल पुणे येथील स्वा. सावरकर अध्यासन केंद्राच्या हॉलमधे आयोजित करण्यात आला होता. महाशब्दकोडेकार श्री. मिलिंद शिंत्रे यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. 'कुटुंब रंगलंय काव्यात'चे श्री. विसुभाऊ बापट तसेच संवेदना प्रकाशनचे सर्वेसर्वा श्री. नितीन हिरवे यांचीही विशेष उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली होती.

श्री. विसूभाऊ बापट यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या काव्याचा धांडोळा घेताना त्यांच्या काही रचनाही सादर केल्या. श्री. मिलिंद शिंत्रे यांनी शब्दकोडी सोडविणे हे मानसिक आरोग्य तंदुरुस्त ठेवण्याचे उत्तम साधन आहे असे सांगतानाच मराठी भाषा समृद्धीसाठी छ. शिवाजी महाराज, स्वा. सावरकर आणि एल्फिन्स्टन यांनी केलेल्या अलौकिक कार्याचा आढावा घेतला.

या कार्यक्रमाला सौ. अपूर्वा मराठे, सौ. साध्वी पटवर्धन, श्री. राजस पटवर्धन, श्री. सुरेश पटवर्धन, श्री. संजय पटवर्धन, सौ. उमा पटवर्धन, सौ. प्रमिला पटवर्धन, सौ. क्षमाताई एरंडे, श्री. दिलीप ललवाणी, सौ. मेधा पटवर्धन, श्री. विजय मराठे, श्री. मुकुंद हरदास, जयश्री बेलसरे, निरुपमा महाजन, योगिता धुमाळ, श्री. अजित पराडकर यांच्यासह १०० हून अधिक कोडेप्रेमी स्नेही आणि आप्तेष्ट, हितचिंतक उपस्थित होते.

श्री. मराठेसरांनी त्यांच्या हजारी शब्दकोड्यांचा प्रवास उलगडतानाच आणखी किमान दोन वर्षे हा उपक्रम चालू ठेवण्याचा मानस जाहीर केला.

शब्दखेळ पुस्तकाची मूळ किंमत २२५ रूपये असून स्पीडपोस्ट चार्जेससह २७५ रुपयात ते घरपोच उपलब्ध होणार आहे.९४०५७५१६९८ या क्रमांकावर GPay/PhonePe करून सर्व कोडेप्रेमींनी हे पुस्तक मागवावे असे आवाहन श्री. मराठेसरांनी केले आहे. ◆

## प्रथमोपचार वर्ग




'मराठे प्रतिष्ठान' आयोजित तारीख ०७ मे २०२३च्या प्रथमोपचार वर्गास जे सभासद उपस्थित होते त्यांना मनापासून धन्यवाद.

कर्नल प्रमोदन यांचे उपयुक्त तसेच आपल्या घरातील साहित्या पासुन प्रथमोपचार करता येतात यांचे आवश्यक मार्गदर्शन झाल्यावर सर्वांनी चविष्ट गरम कांदेपोहे लिंबु सरबताचा आस्वाद घेतला.

'मराठे प्रतिष्ठान' पुणे शाखेने लागोपाठ ३ कार्यक्रम खुपच छान आयोजित केले होते.

प्रथमोपचार वर्गास खालील सभासदांकडून कर्नल प्रमोदन यांना सहकार्य लाभले चिरंजीव मल्हार, सर्वश्री मोहन, पुष्कराज, राजेश, देवयानी यांना मनापासून धन्यवाद 'मराठे प्रतिष्ठान' पुणे शाखा कार्यकारी मंडळा चे मनापासून अभिनंदन पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. ◆

# गाज

◆ अनुपमा जोशीराव, इचलकरंजी

भ्रमणध्वनी : ९८९०९७५४०८

**क**ट्ट्यावरील शिगेला पोचली उत्सुकता नवीन विषयाची
नाद निनादात विषय आला कट्ट्यावरी
नाव होते 'मी कृतज्ञ आहे'
नाव वाचताक्षणी मनात गर्दी झाली विचारांची,
कोणाबद्दल लिहूया की,
गेले नकळत राहुनी कृतज्ञता मानायची,
विचार करीत होते, लिहूया ह्यांच्यावरी
तेवढ्यात दिसली ह्या फेरीची नियमावली,
पहिल्या फेरीत लिहायचे होते व्यापक गोष्टींविषयी.
विचारच करत बसले ह्यावर लिहू का त्यावर लिहू?
तोपर्यंत अनेकांच्या लेखणीतून उतरले अनेक लेख कट्ट्यावरी,
वाचतच राहिले, वाचतच राहिले,
प्रत्येकाची भाषाशैली, जाणत राहिले विचारसरणी.
प्रत्येकाची भावपूर्ण कृतज्ञता व्यक्त होत होती शब्दागणी.
कोणी देवावर, गुरुंवर, कोणी पंचमहाभुतांवर, कोणी निसर्गावर,
कोणी देशावर, सैनिकांवर, कोणी राष्ट्रगानावर, कोणी शाळेवर,
असा हा कट्टा सजला अनेक व्यापक गोष्टीची कृतज्ञता मानूनी.
मला मात्र खुणावते ती गाज सागराची
मज वाटे मंत्रोच्चार, जप जणू काही
भासे मज लय माझ्याच श्वासाची
तिच्या सहवासात तन, मन, जाते हरपूनी
मन होई शांत, प्रसन्न आणि स्वच्छंदी
म्हणून मानते कृतज्ञता त्या सागराच्या गाजेची
जिच्या सादाने आनंद मिळे जीवनी.

**गाज म्हणजे काय**

समुद्राच्या लाटांचा जो आवाज येतो त्याला गाज असे म्हणतात. याला गाज म्हणण्याचं कारण हा आवाज सतत सुरू असतो जसे की एखादा मंत्रोच्चार, जप, श्वासाची लय जसे एका विशिष्ट अशा लयीत चालतात तसा हा आवाज सुरू असतो, म्हणून याला गाज असे म्हटले आहे. गाज ह्या शब्दाचा मूळ धातू गर्ज म्हणजे गर्जती किंवा गर्जयती, गर्जना करणे यावरून गाज हा शब्द निर्माण झाला आहे असे मानले जाते.

आता आपण '**भौगोलिक दृष्ट्या**' विचार करू. सागराच्या पाण्यात ज्या लाटा निर्माण होतात त्यामागे वारा हे मुख्य कारण आहे, वारा म्हणजेच वाहणारी हवा, यामुळे सागराचे पाणी ढकलले जाते व हे पाणी किनाऱ्याकडे येताना जास्त उंचीच्या प्रदेशाकडे येते त्यामुळे वाऱ्यामुळे पाण्यात तयार झालेल्या लाटा या किनाऱ्याकडे येऊन फुटतात आणि त्यातून सागराची गाज आपल्याला ऐकू येते. याचबरोबर समुद्राला येणारी भरती आणि ओहोटी यामुळे सागराच्या गाजेला विशिष्ट लय प्राप्त होते.

या गाजेचा अनुभव घेणे ही एक विलोभनीय कृती आहे. कोकण वासियांना ह्याबद्दल सांगणे न लगे, शहरातील लोकांना मात्र ह्याचे कायमच आकर्षण आहे. तिथे मिळणारी शांतता, प्रसन्नता मनाला आनंद देवून जाते. म्हणूनच त्या सागराला कृतज्ञता पूर्वक नमस्कार.

anupama.joshirao@gmail.com
ज्ञानभाषा मराठी प्रतिष्ठान


◆



# वाचकांची प्रतिक्रिया

**हे**मंतजी, मार्च २०२३ चा 'हितगुज'चा अंक डाऊनलोड करून लगेच एकाच बैठकीत वाचून काढला.

नेहमी प्रमाणे अंक अप्रतिम आणि वाचनीय आहे ही नेहमीची गुळगुळीत प्रतिक्रिया देण्यापेक्षा काहीतरी वेगळे लिहित आहे, जेणेकरून मी अंक वाचून झाल्यावर लेखन केले आहे हे लक्षात येईल.



मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः मप्र

# हितगुज

अंक १३३ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ मार्च २०२३

(फक्त खाजगी वितरणासाठी)

Website : www.marathepratishthan.org

संपादकीय

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना

माझा स्नेहपूर्वक नमस्कार.

हितगुजच्या मार्च महिन्यातला वासंतिक अंक आपल्या भेटीला येत आहे. वसंत ऋतू म्हणजे सर्व ऋतूंचा राजा. निसर्ग बहरलेला, चैतन्यदायी वातावरण असते. फळा-फुलांनी डवरलेला हा सुवासिक वसंत ऋतू.

दि. २७ फेब्रुवारी हा जागतिक मराठी भाषा दिन आहे.

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी**
**धर्म, पंथ, जात, एक जाणतो मराठी**
**एवढ्या जगात माय मानतो मराठी**

इंग्रजी आणि हिंदी अन्य भाषाभगिनींचा दुःस्वास न करता त्यांना सामावून, पचवून त्यांच्याही वरती मराठीचा झेंडा फडकावत ठेवण्याची इच्छाशक्ती प्रत्येक मराठी माणसात असली पाहिजे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे आवश्यक आहे. मराठी मायबोली आपली अस्मिता आहे.

शब्दांची लयलूट करणे किंवा शब्दनिर्मितीच्या टांकसाळी काढणे म्हणजे भाषा समृद्ध करणे नव्हे. जगातील अनेक प्रकारचे आणि मानवाचे विविध अनुभव निकोप, नीट आणि प्रभावीपणे व्यक्त करणारे साहित्य निर्माण करणे, म्हणजे भाषा समृद्ध करणे होय आणि मराठी भाषा ही समृद्ध भाषा आहे.

''माझ्या मराठीचे बोलू कौतुके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळविन'' असा 'ज्ञानेश्वरी'सारख्या ललामभूत ग्रंथाची निर्मिती झाली ती मराठीतून ज्ञानोबांची ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची अभंगगाथा जोवर अक्षर अमर आहेत तोवर मराठी जिवंत राहाणार आहे. मराठीचे भवितव्य उज्वल आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षामध्ये दि. १९ फेब्रुवारी २०२३ पासून कवी राजा बढे यांचे 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे गौरवगीत, महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून अंगिकारण्यात आले आहे, हे स्वागतार्ह, अभिनंदनीय आहे.

दि. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन आहे. स्त्री शक्ती म्हणजे तेजाचे आदिरूप. समाजाची स्वतःची एक संस्कृती असते. तिला वळण व दिशा देण्याचे काम स्त्रिया प्रभावीपणे करतात.

सक्षमता ही आजच्या स्त्रीची ओळख आहे. त्यामुळे ती कोणतेही क्षेत्र असो यशाची मोहोर उमटवते. स्वतःचा विचार, नवा मार्ग आणि ध्येय हे तिचं तत्त्व आहे. सगळी क्षेत्र पादाक्रांत करीत तिनं स्वतःचं आकाश निर्माण केलं आहे. असो.

होळी आणि गुढीपाडव्याच्या समस्त मराठे परिवाराला शुभेच्छा!

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. १६ फेब्रुवारी, २०२३)

भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०००३१
दूरध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई – ४०००३१

१) भा. ल. महाबळ यांचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न नको' हा लेख खरोखरी अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारा. कांग्रेसच्या राजवटीत सावरकरांना भारतरत्न मुद्दामच दिले गेले नाही, आता भाजपा ने ही चूक सुधारावी आणि आता सावरकरांना भारतरत्न द्यावे असे वाटणारे अनेक आहेत. पण लेख वाचल्यावर पटले की खरंच सुर्याला दिव्याचा उजेड पाडायची आवश्यकता आहे का? सावरकरांसारख्या भारतरत्नांना भारतरत्न म्हटले काय आणि नाही काय? त्यांच्या महत्तेवर काहीच फरक पडणार नाही हे या लेखामुळे पटले.

२) कालीदास मराठे यांचा 'सुसह्य करुया शालेय जीवन' हा ही लेख खुप चांगला आहे, पण नुसते लेखन किंवा भाषण यानी ही समस्या सुटणे खुप अवघड आहे. कालीदासजी या क्षेत्रासाठी मी ही खुप प्रयत्न केलेत. २०२२ च्या दिवाळी अंकातील माझा लेख ही या विषयावरच आहे. शालेय शिक्षण आणि अभ्यासक्रम यावर घेण्यात आलेले एका नॅशनल कॉन्फरन्स मध्ये **की नोट ॲड्रेस** देण्याची संधीही मला मिळालेली आहे. त्यातही मी हा विषय हिरहिरीने आणि पोटतिडकीने मांडला आहे, पण आपल्याकडे सरकार बदलले किंवा शिक्षणमंत्री बदलला की हा विषय हमखास फक्त चर्चेत येतो आणि चर्चेपुरताच मर्यादित राहतो.

३) श्रीनिवास मराठे इच्छापत्राबाबत सातत्याने जागृती करीत आहेत. आपल्या ग्रुपमध्ये किती लोकांनी त्यांची दखल घेतली माहिति नाही. पण मी माझी स्थावर आणि जंगम मालमत्ता जास्त नसतांना सुध्दा त्यांनी मागे म्हणजे सुमारे दोन तीन वर्षांपूर्वी अंदाजे दहा पीडीएफ ह्या माध्यमातून ही माहिती ग्रुपवर टाकली तेव्हाच त्याची दखलही घेतली. त्या सर्व पीडीएफ माझ्या नव्यानेच वकिली करणाऱ्या भाचीला फॉरवर्ड केल्या. आणि त्याचा अभ्यास करून तिने माझे इच्छापत्र करून दिले आहे आणि आता इतरांचेही इच्छापत्र करून देण्यासाठी ती त्या माहितीचा आधार घेत असते.

४) सुमेधाताईंनी ना. दा. सावरकर यांच्या 'हिंदू साम्राज्याचा इतिहास' या पुस्तकाचे इतके समर्पक आणि यथोचित शब्दात परिक्षण केले आहे की निर्माण झालेल्या जिज्ञासेमुळे कधी एकदा पुस्तक विकत घेऊन वाचतोय असे झाले आहे.

५) आणि आता सर्वात शेवटी, माझे 'गाव गाथा गजाली, खाट कंदील मजाली' 'हितगुज'मध्ये प्रकाशित झाल्यानें आणखीन ही अशा बऱ्याच आठवणी बाबत आपण लिहायला पाहिजे अशी उर्मी निर्माण झाली आहे. असो अंक नेहमी प्रमाणे वाचनीय आणि संग्राह्य.

**श्री. संजय रामचंद्र मराठे** (पृ. ४१६), अमरावती, (९४२१७४०८९४)

## सहवेदना



वेंगुर्ला-भटवाडी येथील रहिवासी श्रीमती शालिनी जयवंत मराठे(८३) (पृ.३९९) यांचे २९ एप्रिल रोजी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, एक मुलगी, सून-जावई असा परिवार आहे. पुरोहित सुधीर मराठे व 'पारिजात' झेरॉक्सचे मालक सुभाष मराठे यांची ती आई होय. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्रीमती शालिनीताई यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

♦

*अंतरी निर्मळ। वाचेसी रसाळ।*
*त्याच्या गळा । माळ असो नसो*

**– संत तुकाराम महाराज**

# महीपतीबोवा ताहराबादकर
## (शके १६३७-१७१२)

♦डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

**म**हीपतींचा जन्म शके १६३७ (इ.स.१७१५) मध्ये अहमदनगर पासून १८ कोसांवर असलेल्या राहुरी तालुक्यातील ताहराबाद या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दादोपंत कांबळे असून ते ताहराबादचे कुळकर्णी (व जोशी) होते. ते ऋग्वेदी वसिष्ठगोत्री ब्राह्मण असून अत्यंत भाविक होते. महीपतींची आई गंगाबाई सुद्धा मोठी साध्वी व पतिपरायण होती. दादोपंतांना साठीच्या सुमारास 'महीपती' हा मुलगा झाला. महीपती रूपाने सुंदर, सुदृढबांध्याचे, स्वभावाने वडिलांसारखे असले तरीपण परम तेजस्वी, मानी व करारी असे होते. वयाच्या १६व्या वर्षीच ते कुळकर्णीपदाचे काम करू लागले.

महीपतीचे शिक्षण बरेच झाले होते, हस्ताक्षर चांगले असून त्यांना संस्कृत भाषेचे ज्ञान चांगले होते. त्यांच्या ग्रंथांवरून त्यांचे मराठी भाषेचे ज्ञान तर चांगले होतेच शिवाय पूर्वी होऊन गेलेल्या बहुतेक मराठी कवींची कविता त्यांनी लक्षपूर्वक वाचली होती. मराठी, संस्कृत शिवाय गुजराथी, कानडी व हिंदी भाषांचे ज्ञानही महीपतींस होते.



महिपती ज्या गावचे कुळकर्णी व जोशी होते ते ताहराबाद गाव मुसलमानास जहागीर मिळाले होते. त्या मुसलमानाच्या कचेरीत महीपतीस नित्य जावे लागत असे एके दिवशी कचेरीतून येऊन ते स्नानसंध्या करून देवपूजेस बसले असता जहागीरदाराचा शिपाई त्यांस बोलावण्यास आला. 'देवपूजा आटोपताच येतो' असे महिपतींनी सांगितल्यावरही आणखी दोन बोलावणी आली. तेव्हां तो यवन शिपाई त्यांस उणे-आधिक शब्द बोलला ते ऐकून महीपतीस फार वाईट वाटले, जहागीरदाराचे काम संपवून घरी परतल्यावर, कानास लेखणी होती ती देवापुढे ठेवून त्यांनी शपथ वाहिली की, ''आजपासून गांवकामांत लेखणी हातीं धरणार नाही.'' ही शपथ त्यांनी व त्यांच्या सातपिढ्यांपर्यंत पाळली जावयाची आहे.

महिपतीबुंवानी आपल्या वडिलांची पंढरीची वारी त्यांच्या हयातीतच पुढे चालविली. महीपतींस तुकाराम महाराजांनी स्वप्नात दृष्टान्त दिला की, 'नामदेवांचा शतकोटी' अभंग करण्याचा संकल्प माझ्या हातून पुरा झाला; आता संतचरित्रांचे वर्णन तुमच्या मुखाने व्हावें आणि तुकारामबुवांनी आपला वरदहस्त महिपतींच्या डोक्यावर ठेवला आणि त्या दिवसापासून महिपतीबुवांना काव्यस्फूर्ति आली; या विषयी संतलीलामृताच्या प्रथम अध्यायात महिपती म्हणतात,

ज्यांने मस्तकी ठेविला अभयकर।
दुस्तर भवाब्धि केला पार।
तो तुकाराम सद्गुरू वैष्णववीर।
ग्रंथारंभी नमस्कार तयासी।।१।।
मृत्युलोकीं दाविली अघटित करणी।
देहासमवेत गेले वैकुंठभुवनीं।
अद्यापि शुद्ध भाव देखोनी।
देती स्वप्नीं उपदेश।।२।।

त्याचप्रमाणे 'भक्तलीलामृत' ग्रंथाच्या प्रथमाध्यायातही महिपती म्हणतात:

जो भक्तिज्ञान वैराग्य पुतळा।
ज्याचे अंगी अनंतकळा।
तो सद्गुरू तुकाराम आम्हांसि जोडला।
स्वप्नीं दिधला उपदेश ।।२०।।

महीपतींनी अनेक ग्रंथ रचिले असून एक संत चरित्रकार म्हणून श्रीमहीपतीबोवा ताहराबादकरांचे कार्य फार मोलाचे आहे. अत्यंत

परिश्रम घेऊन त्यांनी आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या संतांची माहिती जमा केली, त्यांच्याविषयीच्या आख्यायिक, दंतकथा संग्रहीत केल्या; आणि या सामग्रीच्या साहाय्याने अनेक मराठी संतांची वाङ्मयीन मूर्ती त्यांनी आपल्या चरित्रग्रंथांमधून उभी केली आहे.

अशाच एका थोर संताचे, संत एकनाथ महाराजांचे वाङ्मयीन चरित्र महिपतींनी आपल्या 'भक्तविजय' ग्रंथात लिहिले असून या चरित्रात, एकनाथ महाराजांना श्री दत्तदर्शन कसे झाले, या घटनेचे अद्भुताधीष्ठित रसाळ वर्णन केले आहे. एकनाथांना त्यांचे गुरु जनार्दन स्वामी यांनी दत्तदर्शन घडवून देऊ, असे वचन दिले होते. त्याची याद देऊन ''आपण आज मला दत्तदर्शन घडवा'', असा आग्रह श्रीएकनाथांनी आपल्या गुरूजवळ धरला. त्या प्रसंगाचे वर्णन करताना महीपतीबोवा म्हणतात,

तें आजि आपुले स्वमुखेंकरून॥
स्वामींनी मज दिधले अभयवचन॥
तो आजि मनोरथ पूर्ण करून॥
करवावें दर्शन दत्ताचें॥८०॥ अ.४५
ऐसा पूर्ण जाणूनि हेत॥
एकनाथासी नेलें अरण्यांत॥
तव तेथें अनुसूयासुत अकस्मात॥
आले त्वरित भेटावया॥८१॥
जनार्दन म्हणे एकनाथा।
आमुचे स्वामी ओळखें आतां॥
तो अविंध बैसोनि अश्वावरूता॥
आला अवचिता त्या ठाया॥८२॥
ऐसें रूप देखतां दृष्टी॥
एकनाथ भयभीत जाहले पोटी॥
म्हणे प्रत्यक्ष यवन दिसतो दृष्टी॥
असत्य गोष्टी मज वाटे॥८३॥
विशाल भाल आरक्त नयन॥
हाती शस्त्रे अश्ववाहन॥
संन्निध येऊनि उतरला जाण॥
मग केले नमन जनार्दनें॥८४॥
यवनभाषेनें अनुसूयासुत॥
जनार्दनासीं बैसले बोलत॥
हे दृष्टीसी देखोनि एकनाथ॥
आश्चर्य करीत मानसीं॥८५॥

(श्रीदत्तात्रेयांनी एकनाथमहाराजांच्या डोक्यावर अभयकर ठेऊन त्यांना वर दिला त्याचे वर्णन करताना श्रीमहिपतीबोवा म्हणतात–

मग एकनाथासी बोलावूनि लवलाहीं॥
उचलोनि घातला स्वामींचे पायी॥
त्यांनी आश्वासन देऊनि पाहीं॥
वरदान काही बोलत॥११७॥
श्रुतिशास्त्रांचे जें मथित॥
व्यासें काढिलें श्रीभागवत।
त्याचा अर्थ सखोल गुप्त॥
वदेल प्राकृत प्रसिद्ध हा॥११८॥
आणिक भावार्थ रामायण॥
वदेल रसाळ निरूपण।
तें श्रवण करितां प्रीतीकरून॥
तरतील जन सकळिक॥११९॥
आणिक पदपदांतरे बहुत॥
श्रीहरिचरित्र अति अद्भुत॥
कीर्तनी गाऊनि प्रेमयुक्त॥
उद्धरील पतित श्रवणमात्रें॥१२०॥
ऐसावर देऊनि सत्त्वर॥
मस्तकीं ठेविला अभयकर॥
निमिष लोटतां साचार॥
अदृश्य जाहले तेधवा॥१२१॥

महीपतींच्या काळात एकनाथांच्या बद्दल कोणता समज प्रचलित होता याची साक्ष आपणांस या भक्तविजयामधून मिळते; परंतु या आख्यायिकेच्या सत्यतेबद्दल मात्र शंका वाटते. एकनाथ अविंधाला पाहून घाबरण्याइतके भित्रे होते काय? आपल्या गुरूवर आलेली शत्रूंची टोळधाड, आपल्या गुरूंचा पोषाख करून, त्यांनी पिटाळून लावल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रात आला आहेच. तेव्हां ही आख्यायिका खरी वाटत नाही. मात्र मुसलमानी राजसत्तेने महीपतींच्या काळापर्यंत हिंदूवर कशी जबरदस्त जरब बसविली होती याचे दर्शन या आख्यायिकेमधून चांगले घडते.

महीपतींच्या काव्यरचनेत, त्यांनी, ''दत्तात्रेय जन्म'' या नावाचे एक ११२ ओव्यांचे आख्यान रचिल्याचे आढळते. परंतु ते अनुपलब्ध असल्यामुळे त्याबद्दल काही सांगता येत नाही.

महिपतींनी आपले ग्रंथ फार परिश्रमपूर्वक व शोधपूर्वक लिहिले आहेत. महिपतींची वाणी रसाळ, प्रासादिक व साधी आहे. त्यांच्या ग्रंथात भक्तीरस नुसता उंचबळून राहिला आहे. वर्णने सुंदर आणि उपमा अत्यंत समर्पक आणि हृदयंगम आहेत. महीपतींच्या कवितेत खरे कवित्व असल्यामुळे यांची लोकप्रियता आजपर्यंत कायम राहिली आहे. तशीच ती पुढेही राहील.

♦

# स्वरांचा साधक

◆ मुकुंद मराठे (पृ.३६८) भ्रमणध्वनी : ९८९२३१५७३१

**पंडित सुरेश बापट यांच्या साठीचा सोहळा दि. ७ एप्रिल २०२३ला दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात संपन्न झाला. त्या निमित्ताने त्यांच्या वाटचालीचा आणि योगदानाचा परमार्श श्री. मुकुंद मराठे यांनी पुढील लेखात घेतला आहे.**

जन्मजात ठाणेकर निवासी असलेल्या सुरेश बापट यांच्या घरातच बालपणापासून संगीताचे वातावरण लाभले होते. दादा पाटीलवाडीमध्ये ते राहत. पाटलांकडे दरवर्षी अनंत चतुर्दशीला लीलाताई शेलार, अच्युतराव अभ्यंकर, यशवंतराव वैद्य, वासुदेवराव जोशी यांची मैफल असे. शेवटी संगीत भूषण पंडित राम मराठे हे उत्तररात्री गायनासाठी येत. इथेच सुरेश दहाव्या वर्षीच अभंग, भजन, गवळण नाट्यपदे उत्तम सादर करत असे. त्याच्या घरी एकही वाद्य नव्हतं. पण संगीतप्रेमी असलेले सुरेशचे पिताश्री प्रभाकर बापट यांच्याकडे ग्रामोफोन आणि अनेक ध्वनिमुद्रिका मात्र होत्या. त्यांची दैवतं म्हणजे राम मराठे, सुरेश हळदणकर, माणिक वर्मा, भीमसेन जोशी आणि हार्मोनियम ऑर्गन वादक गोविंदराव पटवर्धन! या गायकांच्या ध्वनिमुद्रिका परत परत ऐकणे हा बाल सुरेशचा व्यासंगच होता. खणखणीत आवाज, आत्मविश्वासपूर्ण गायन आणि गळ्यात उपजतच फिरकीची जलद तान असलेला हा बालक सर्वांचे लक्ष वेधून घेत असे. लीलाताई शेलार यांच्याकडे तो प्राथमिक गायन शिकला. इथे हार्मोनियम आणि तबल्याची ओळख झाली, गळ्यावरती संस्कार तर होतच होते. पुढे लीलाताईंनी त्यांचे गुरू भास्करराव फाटक यांच्याकडे सुरेशला पाठवले. या काळात एकीकडे तो शिक्षण, विविध कला स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवत होता. 'संगीतकार वसंत देसाई स्वर प्रतिष्ठान' आयोजित स्पर्धेत १९७८ मध्ये त्यांना पंडित कुमार गंधर्व यांच्या हस्ते प्रथम पारितोषिक मिळाले. या स्पर्धेला पंडित प्रभाकर कारेकर हे परिक्षक होते. त्यांनी सुरेशला स्वत:हूनच शिष्य म्हणून स्वीकारले. पुढे आठ वर्षे तालीम कारेकर बुवांनी दिली. शिवाय त्यांच्याबरोबर अनेक कार्यक्रमाला तंबोऱ्याची आणि गायनाची स्वरसंगत करून मैफल मांडणी, सादरीकरणाचा अनुभव मिळवला. त्यामुळे कारेकर बुवांची गायनशैली, तान इ. गळ्यात छान बसली.

पोद्दार महाविद्यालयात वाणिज्य शाखेत शिक्षण घेत असताना सांगलीच्या कारळे ट्रस्टतर्फे १९८० मध्ये शास्त्रीय आणि नाट्यसंगीत स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस पं. राम मराठे यांच्या हस्ते मिळाले. या संदर्भात एक सुंदर प्रसंग पुढे घडला. ठाण्यातच मराठी ग्रंथ संग्रहालय येथे विश्वनाथ कान्हेरे यांनी हार्मोनियम वादक एकनाथ ठाकूरदास यांची पुण्यतिथी आयोजित केली होती. इथे पं. रामभाऊंच्या समोर गायचे होते. सुरेशना दडपण आले. ते रामभाऊंनी ओळखले व सुरेशच्या वडिलांना ते मिश्कीलपणे म्हणाले, 'याला मी आज एक रुमाल भेट देतो. केवढा घामाघूम झालाय. रुमाल अशासाठी की या रुमालामुळे त्याला कायमची आठवण राहावी की, दोन तानपुऱ्यांमध्ये बसल्यावर तू राजा आहेस, बादशहा आहेस, अजिबात घाबरायचं नाही.'

सुरेशचे आतेभाऊ शामराव आणि विलासराव गोडबोले यांच्या शिवाजी पार्क येथील घरात अनेक कलाकारांची उठबस असे. रामभाऊ, सुरेश हळदणकर, कुमार गंधर्व आणि गोविंदराव पटवर्धन हे गोडबोले परिवाराचे फॅमिली डॉक्टरप्रमाणे फॅमिली गायक होते. या काळात गोडबोले बंधूंमुळे सुरेशला या कलाकारांच्या भरपूर मैफिली ऐकायला मिळाल्या. त्याबरोबरच भीमसेन जोशी, मल्लिकार्जुन मन्सूर, माणिक वर्मा, बसवराज राजगुरू, मालिनी राजुरकर, किशोरी अमोणकर, प्रभा अत्रे, सी. आर. व्यास, यशवंतबुवा जोशी असे दर्जेदार गायक ऐकायला मिळाले. माटुंग्याचा नपु हॉल, दादर माटुंगा कल्चरल सेंटर, हरी महादेव वैद्य हॉल, धुरू हॉल, लक्ष्मीनारायण बाग, ब्राह्मण सभा, ब्राह्मण सेवा मंडळ, तालमायकी वाडी, सचिवालय जिमखाना... तसेच, लालबागच्या श्रीकृष्ण दुग्धालयाचे काका फणसे अशा विविध ठिकाणी मैफली सतत झडत असत. यांच्याबरोबर साथसंगतही तितकीच जोरदार असे. संवादिनीसाठी गोविंदराव पटवर्धन, तुलसीदास बोरकर, विश्वनाथ कान्हेरे, विश्वनाथ पेंढारकर तसेच तबलावादक नाना मुळे, ओंकार गुलवडी, एस. व्ही. पटवर्धन, भाई गायतोंडे, सुरेश तळवलकर, विभव नागेशकर, रमाकांत म्हापसेकर असे डौलदार, वजनदार आणि भारदस्त ठेका देणारे वादक असत.

सन १९८५ मध्ये बँक ऑफ इंडियात नोकरी लागल्यानंतर सुरेश यांना कारेकर बुवांकडे जायला जमेनासे झाले. या काळात ते १९८७ ते ९२ ठाण्यातील विद्वान गायक पंडित यशवंतबुवा वैद्य त्यांच्याकडे तालीम घेऊन त्यांनी संगीत विशारद पूर्ण केले. त्यात ते भारतातून प्रथम आले. पुढे त्यांना अशोक रानडे यांच्यासारखा विचक्षण गुरू लाभला. साथीदार शेखर खांबेटे आणि मकरंद कुंडले ह्यांच्यामुळे रानडे यांनी तयार केलेल्या 'बैठकीची लावणी' या कार्यक्रमात गायची संधी मिळाली. तेव्हापासून रानडे यांच्या विविध संकल्पनांवर आधारित अशा संशोधित कार्यक्रमामध्ये सुरेशजी सहभागी होऊ लागले. रानडे सरांकडे रीतसर तालीम सुरू झाली. त्यामुळे एकूणच शास्त्रीय संगीताकडे आणि संगीत या विषयाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला.

आलापदृष्टी, तर्कसंगतीने रागवाचक आलाप, आणि त्याची बढत, गाताना सुध मुद्रा सुध बानी, बंदिशीची नेमकी मांडणी आणि शब्द सुस्पष्ट उच्चारण, आघातहीन बोलताना व लयकारी बरोबर खेळणे, विविध तालांगाची लयकारी, दोन तानपुरे एकाच स्वरपट्टीत उत्तम जुळवणे, एकाच रागातल्या अनेक विविध बंदिशी, रागाची चलन आणि चौकट, एकाच रागातील अनेकविध अशा विविध तालातील बंदिशी, अनवट अप्रचलित आणि जोडराग सोडवायची पद्धत, टप्पा, ठुमरी, दादरा, कजरी, होरी, टपख्याल... असे गानप्रकार शिकायला मिळाले. आग्रा, ग्वाल्हेर, जयपूर अशा तीनही घराण्यांचे रसायन आणि त्याचे सादरीकरण समजू लागले. विलंबित ख्यालाचे आवर्तन भरण्याची प्रक्रिया कळली. आवाजशास्त्र, आवाजफेक, गोलाईयुक्त आकार, तर्कशुद्ध मुद्देसूद योग्य शब्दात स्वच्छ विचार मांडणी, नोटेशन अर्थात स्वरावली, चिंतन व मनन या साऱ्यांची तयारी झाली. सरांच्या सहवासामुळे हे घडून आले. रानडे सरांमुळे एकूणच सांगीतिक आणि वैचारिक समृद्धी लाभली.

रानडे गुरुजींच्या निधनानंतर पुढे दोन-तीन वर्ष बबनराव हळदणकर यांच्याकडे आग्रा घराण्याचे काही खास अप्रचलित राग सुरेशजी शिकले. शिवाय सतारवादक आणि बंदिशकार पंडित शंकरराव अभ्यंकर आणि वासुदेवजी जोशी या दोघांनी असंख्य बंदिशी प्रेमाने शिकवल्या. सन २०१९ मध्ये 'आकाशवाणी'ची सर्वोच्च श्रेणी मिळाली. तत्कालीन आकाशवाणी व दूरदर्शनचे अतिरिक्त महासंचालक नीरज अग्रवाल यांनी पंडित विभव नागेशकर, डॉ. राम देशपांडे, कैलास पात्रा, सुरेश बापट या कलाकारांना सन्मानपूर्वक ही श्रेणी बहाल केली होती. सुरेशजींनी सांगितिक प्रवासात अनेक महोत्सवांमध्ये कार्यक्रम, परदेश दौरे, विविध कॅसेट व सीडीसाठी गायन, स्वरूपानंद स्वामींसाठी अभंग, स्वरचित बंदिशी... असे खूप काम केले आहे. निवृत्तीनंतर आता ते पूर्णवेळ आपल्या वैयक्तिक मैफिली, चिंतन आणि उत्तम रियाझी साधक विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीत शिकवण्याचे कार्य करत आहेत. पत्नी मनीषा आणि दोन्ही सुपुत्र ह्यांचे त्यांना चांगले पाठबळ लाभले. एक सांगीतिक बांधिलकी म्हणून ठाण्यामध्ये अनंत जोशी, शशांक दाबके, धनश्री लेले, मुकुंद मराठे आणि सुरेश बापट आदी मंडळीच्या पुढाकाराने ज्येष्ठ व युवा कलाकार घट्ट विणेनी बांधले गेले आहेत.


आमराग, तसेच अनवट अप्रचलित रागाच्या शुद्ध मांडणीसह बंदिशींचा साठा असलेला, असा सध्याचा एक कोठीवाले विद्वान गायक (कोठीवाले म्हणजे.. विविध रागातील अनेक बंदिशींचा संग्रह असलेला गायक.) म्हणून आज सुरेशजी ओळखले जातात. हे परंपरेचे घरंदाज गायन पुढे नेण्यासाठी सुरेशजींना उत्तम आयुरारोग्य लाभो हीच प्रार्थना!

♦

## सहवेदना



मी राहुल रविंद्र विद्वांस (कल्याण), माझी आई सौ उज्वला रविंद्र विद्वांस (पृ. ६४९) हि दिनांक २३ मे २०२३ रोजी दुपारी १.३० मि. स्वर्गवासी झाली. तिचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे. सौ उज्वला रविंद्र विद्वांस पुर्वाश्रमीची द्वारका अंबादास वैद्य (पुणे) हिचा विवाह जुलै १९८०ला श्री. रविंद्र विद्वांस यांच्याशी झाला. डोंबिवली येथील राष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या स्वामी विवेकानंद शाळेत १९८० च्या सप्टेंबर महिन्यात सेविका म्हणुन रूजु झाली. हळूहळू शाळेच्या वाढी बरोबर काही वर्षे राणाप्रताप, दत्तनगर, सेवानिवृत्तीच्या काळात परत राणाप्रताप येथे सेवा करून सेवानिवृत्त झाली. गेली काही दिवस दम्याच्या त्रासामुळे आजारी होती.



दि. २३ मार्च २०२३ला राहुल यांच्या चिरंजीवांची मिहीरची मुंज थाटामाटात संपन्न झाली होती. हे वाचकांना आठवत असेल. मराठे प्रतिष्ठानच्या सौ. उज्वला रविंद्र विद्वांस यांना भावपूर्ण श्रद्धांजली. श्री. राहुल रविंद्र विद्वांस म.प्र. कार्यकारिणीत सक्रिय सभासद म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात म.प्र. सहभागी आहे.

♦

# वंदे मातरम्

◆ श्रीधर मराठे (पृ. ३९६), सौ. प्राची ज्योशीराव (पृ. ३८९), शुभदा दीपक (पृ. ५३३)

वंदे मातरम्
सुजलां सुफलां मलयजशीतलाम्
शस्यशामलां मातरम्।
शुभ्र ज्योत्स्ना पुलकित यामिनीम्
फुल्ल कुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीं सुमधुर भाषिणीम्
सुखदां वरदां मातरम्।
कोटि-कोटि कण्ठ
कलकल निनाद कराले
दिसप्त कोटि भुजैर्धृत स्वरकरवाले
के बोले मा तुमी अबले
बहुबल धारिणीं नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीं मातरम्।।
तुमि विद्या तुमि धर्म,




तुमि हृदि तुमि मर्म
त्वं हि प्राणाः शरीरे।
बाहुते तुमि मा शक्ति
हृदये तुमि मा भक्ति
तोमारै प्रतिमा गड़ि
मन्दिरे मन्दिरे।
त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमल दल विहारिणी
वाणी विद्यादायिनी नमामि त्वाम्
नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्।।
शामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणीं भरणी मातरम्।।

.........................................

माते, मी तुला वंदन करतो!

जलसमृद्ध नि धनधान्यसमृद्ध; दक्षिणेकडील मलयपर्वतावरून येणाऱ्या वायुलहरींनी शीतल होणाऱ्या नि विपुल शेतीमुळे श्यामलवर्ण बनलेल्या, हे माते! पांढऱ्याशुभ्र चांदण्यामुळे तुझ्या रात्री प्रफुल्लित असतात. तर फुलांना बहर आल्यामुळे तुझी भूमि वृक्षराजीचे वस्त्र परिधान केल्यासारखी सुशोभित दिसते. सदा हसतमुख नि सर्वदा मधुर बोलणारी, वरदायिनी सुखप्रदायिनी, अशा हे माते!

कोटि-कोटि मुखांतून भयंकर गर्जना उठत असतांना,

हे माते, तू अबला आहेस असे म्हणण्याचे धारिष्ट तरी कोण करणार?

खरोखरी, माते, अपार सामर्थ्य तुझ्या ठिकाणी आहे. शत्रुसैन्याच्या लाटा परतवून लावून आम्हां संतानांचे रक्षण करणाऱ्या हे माते. मी तुला नमस्कार करतो.

तूच आमचे ज्ञान, तूच आमचे चारित्र्य नि तूच आमचा धर्म आहेस. तूच आमचे हृदय नि तूच आमचे चैतन्य आहेस.

आमच्या देहातील प्राण खरोखरीच तूच आहेस.

आमच्या मनगटांतील शक्ति तूच आणि आमच्या अंतःकरणातील कलि पण तूच. मंदिरामंदिरातून आम्ही ज्या देव मूर्तींची प्रतिष्ठापना करतो ती सर्व तुझीच रूपे. आपल्या दाही हातांत दहा शस्त्र धारण करणारी शत्रुसंहारिणी दुर्गा तूच आणि कमलपुष्पांनी भरलेल्या सरोवरात विहार करणारी कमल कोमल लक्ष्मी तूच.

विद्यादायिनी सरस्वतीही तूच, तुला आमचा नमस्कार असो.

माते, मी तुला वंदन करतो. ऐश्वर्यदायी, पुण्यप्रद नि पावन, पवित्र जलप्रवाहांनी नि अमृतमय फळांनी समुद्ध असलेली, अशा हे माते, तुझ्या थोरवीला कशाचीच जोड नाही; कोणतीच सीमा नाही. हे माते, हे जननी, आम्ही तुला प्रणाम करतो.

माते, तुझा वर्ण श्यामल आहे. तुझें चारित्र्य धवल आहे.

तुझे मुख सुंदर हास्याने विलसत आहे.

तू सर्वाभरणभूषित असल्याने किती सुंदर दिसतेस!

खरोखरी, आम्हांला धारण करणारी तूच आणि भरणपोषण करणारी ही तूच माते, तुला आमचे पुनश्च प्रणिपात. ◆

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२३

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस आणि तद्‌जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी **'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा'** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची किमान दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **स्पर्धेसाठी नोंदणी :** स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी दि. 9 सप्टेंबर 2023 पर्यंत 9220699957 या क्रमांकावर SMS करून आपले नाव व राहण्याचे ठिकाण याची नोंदणी करावी.
- **भाग घेण्यासाठी पात्रता :** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@marathepratishthan.org या इ-मेल आयडीवर केवळ '.jpg' format मधील कमाल 2 फाइलद्वारे. प्रत्येक फाईल कमाल 800 kb.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. 19 सप्टेंबर 2023 ते दि. 30 सप्टेंबर 2023.
- प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डिंग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- छायाचित्रे GPS Enabled असावीत. म्हणजे फोटो काढल्याचे ठिकाण कळू शकेल.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परिक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

| **या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके:** | | |
|---|---|---|
| **प्रथम पारितोषिक : रु.1001/-** | **द्वितीय पारितोषिक : रु. 751/-** | **तृतीय पारितोषिक : रु. 501/-** |
| **20 पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास 2 उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील.** | | |

**टीप:**

1. मराठे प्रतिष्ठानच्या **'कार्यकारिणी सदस्यांना'** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.
2. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.
3. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा.
4. कमीतकमी 7 प्रवेशिका आल्या तरच स्पर्धा घेण्यात येईल, अन्यथा स्पर्धा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ई-मेल: hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७

# जान है, तो जहाँ है।

• प्रमोदन मराठे (पृ.३८८) भ्रमणध्वनी : ७२७६०५०९८७

**पै**सा आणि इतर ऐहिक सुखं प्राप्त करण्याची मानवाची इच्छा असते. पण व्याधींचा नाश आणि उपशमन ही मूलभूत गरज आपल्या धकाधकीच्या जीवनांत नजरेआड होते. व्याधी उत्पन्न झालीच तर अमाप पैसे खर्च करून आपण वैद्यकीय उपचार करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. पण व्याधी हे एक वयोमानाप्रमाणे किंवा परिस्थितीजन्य अपरिहार्य सत्य आहे. त्याला अपवाद नाही. या व्याधी अनेक कारणांमुळे उद्‌भवू शकतात. अपघात, घरांतच पडणे, वयस्कर लोकांना हृद्रोगासारख्या व्याधी उद्‌भवणे, आगीची झळ पोहोचणे, खेळतांना लहान मुलांना जखमा होणें या सारख्या अनेक घटना घडताच असतात.

व्याधी अचानक उद्‌भवू शकतात. त्या सांगून येत नाहीत. काही व्याधी अशा असतात कि काहीं मिनिटांमध्ये व्याधिग्रस्त माणसाला तात्काळ प्रथमोपचार देण्याची गरज असते. त्या प्रथमोपचारानंतर वैद्यकीय मदत देणे गरजेचे असते. कारण, रुग्णवाहिका ताबडतोब उपलब्ध होईल आणि वाहतुकीच्या कचाट्यामधून निसटून आपल्यापर्यंत वेळेवर पोहोचेल याची खात्री नसते. डॉक्टरांचा कधी कधी नाईलाज होतो, आणि इलाज करण्यासाठी उशीर झाला असं डॉक्टर म्हणतात. पण, जर योग्य प्रथमोपचार दिला तर व्याधींची प्रखरता कमी होते आणि डॉक्टरांना इलाजासाठी पुरेशी संधी मिळते. पडझडीमुळे झालेली फ्रॅक्चर, जखमेमुळं होत असणारा रक्तस्त्राव किंवा वृद्ध व्यक्तींना अचानक येणारा हृदयाचा झटका, सर्पदंश, यावर योग्य प्रथमोपचार देऊन रुग्णालयात नेल्यास इलाज जास्त परिणामकारक होऊ शकतो आणि आपल्या माणसाचे प्राण आपण वाचवू शकतो. अशा प्रकारच्या प्रथमोपचाराची माहिती प्रत्येक व्यक्तीला असणे महत्वाचे आहे. त्याच प्रमाणे इजा होऊ नये म्हणून घ्यायची काळजी, आणीबाणीच्या परिस्थितीत संपर्क करण्याचे क्रमांक माहीत असणे हेसुद्धा महत्वाचे आहे. कारण सुरक्षा ही प्रत्येकाच्या आयुष्याची मूलभूत गरज आहे. आपल्या नोकरी-व्यवसायात आपण कितीही व्यग्र असलो तरीही प्रथमोपचार माहीत असणे, योग्य संस्थेकडून तो शिकून घेणे अत्यावश्यक आहे.

रेड क्रॉस, सेंट जॉन ॲम्ब्युलन्स अशा जागतिक स्तराच्या संस्था तसेंच सिव्हिल डिफेन्स आणि इतर सामाजिक संस्था हे प्रशिक्षण देतात. या संस्था असे मूलभूत प्रशिक्षण १ दिवसात आणि प्रगतशील प्रशिक्षण २ दिवसाच्या कालावधीत देतात. खरं म्हणजे असे प्रशिक्षण इयत्ता १० वी नंतर अभ्यासक्रमाचा एक भाग असायला हवा. आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण हळू हळू शिक्षणक्रमात येत आहे. पण ते फक्त माहितीच्या सदरात आहे. कृतिबद्ध प्रशिक्षणाची गरज आज आपल्या विचारात येण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रत्येक व्यक्ती आपत्तीच्या वेळी मदत करण्याचा जरी प्रयत्न करत असला तरी ती कृती बरोबर असेलच असे नाही. शास्त्रीय दृष्ट्या माहिती मिळवण्याची आणि त्याआधारे कृती करण्याची गरज आहे. आणि तशी माहिती प्रशिक्षणाद्वारे मिळवायला हवी. आपल्याच जिवाभावाच्या व्यक्तींच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या व्याधींची प्रखरता कमी होण्यासाठी १ ते २ दिवस खर्च करणें योग्यच आहे, अवास्तव नाही.

भारतांत रस्त्यावरच्या अपघातांमध्ये दार वर्षी १.५ लाख माणसे मृत्युमुखी पडतात. आज आगीचे प्रमाण खूप वाढले आहे. अपघातांच्या खालोखाल आगीमुळे मृत्यूपावणाऱ्यांची संख्या आहे. आपल्या उत्सवांमध्ये किंवा घरांत घेण्यासारख्या काळजीच्या अभावामुळे किंवा शॉर्ट सर्किटमुळे लागणाऱ्या आगीचे प्रमाण खूप आहे. आगीच्या विरोधात प्रतिबंधात्मक कारवाई आणि आग विझवण्याच्या परिस्थितीजन्य अनेक कृती शिकून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था उपलब्ध आहेत. कारण, आगीची प्रखरता प्रत्येक मिनिटाला आधीपेक्षा दुप्पट होते. आगीचा बंब घटनास्थळी पोहोचेपर्यंत त्या आगीला आपण पायबंद घालू शकलो तर जीवितहानी आणि वित्तहानी कमी करू शकतो.

इंग्रजीमध्ये म्हण आहेच, अ स्टिच इन टाइम ..... .

♦



## हसरे हितगुज

**मास्तर** : गण्या, विन्या शाळेत यायला उशीर का झाला?
**गण्या** : मी स्वप्नात अमेरिकेला गेलो होतो.
**विन्या** : आणि मी गण्याला आणायला गेलो होतो.

# संरक्षण

◆ राधा मराठे (पृ.३७८)

सुजाता सेकंड शिफ्ट संपवून निघाली. अवघा २ मिनिटांचा उशीर झाला तर कॅब निघून गेली होती. ती चरफडली. उद्या तक्रार करायची ठरवली. पण आत्ता काहीतरी सोय करायला हवीच होती. तिने app वरून रिक्षा मागवली आणि देवाचं नाव घेऊन रिक्षात बसली.

थोड्या वेळाने तिला जाणवलं, रिक्षावाल्याची चलबिचल सुरू होती. आरशातून तो तिच्याकडे पाहत होता. आता तो काहीतरी अचकट विचकट गाणी म्हणायला लागला. सुजाताच्या हाता-पायातलं त्राण गेलं, घशाला कोरड पडली.



अचानक एक बाईकवाला सुसाट वेगाने रिक्षाला ओव्हरटेक करून गेला आणि फरलांगभर अंतरावर गर्रकन वळून थांबला. रिक्षावाल्याने ४ शिव्या हासडल्या आणि रिक्षा वेगात सोडली. त्याला मागे टाकून थोडा पुढे आला तर परत तेच. आता रिक्षावाला पुरता पिसाटला आणि जीव खाऊन रिक्षा पळवायला लागला. बाईकवाला घिरट्या घालत राहिला.


बघता बघता सोसायटीच्या दाराशी पोचली रिक्षा. सुजाता उतरून गेटशी धावली. मागे वळून बघते तो रिक्षावाला मगासारखा सुसाट जात होता आणि बाईकवाला कुठे दृष्टीपथात नव्हता. सकाळी पेपरमध्ये बातमी- 'बाईकवाल्याशी स्पर्धा करताना रिक्षावाला अपघातात जबर जखमी.'

त्या परिसरात बऱ्याच जणांना तो बाईकवाला दिसतो, गस्तीच्या पोलिसांना मात्र आजपर्यंत एकदाही दिसलेला नाही.

ती थक्क. ४ वर्षांपूर्वी त्या रस्त्यावर घडलेली घटना तिला माहितच नव्हती.

शेवटचा शो बघून घरी येणाऱ्या एका जोडप्याला गुंडांनी अडवलं, त्याचं डोकं फोडून तिला उचलून नेली. २ दिवसांनी तिचं प्रेत वाईट अवस्थेत सापडलं. तेव्हापासून त्या परिसरात रस्त्यावरून एकट्या जाणाऱ्या मुलींना त्या बाईकस्वाराचं संरक्षण असतं.

◆







मोहन मराठे खार (पृ. ३६५)

# महाराष्ट्राची वाटचाल - बलाढ्य इन्स्टिट्यूशन ते कमजोर ऑर्गनायझेशन?

◆डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो!

सन १९१० मध्ये माझे पणजोबा राजस्थानातून येऊन पुण्यात स्थायिक झाले. आमची येथील चौथी पिढी. मी व्यक्तीशः स्वतःला खूप नशीबवान समजतो की मी एक महाराष्ट्रीय आहे. माझं असं प्रांजळ मत आहे की 'महाराष्ट्रीय मारवाडी' हे अनेक परीमाणांवर तुलनात्मकदृष्ट्या अन्य राज्यांमधील स्थलांतरीत मारवाड्यांच्या तुलनेत सामाजिक व सांस्कृतिक पातळ्यांवर अधिक प्रगल्भ आहेत. ही कृपा अर्थातच महाराष्ट्राची! मला समजू लागल्यापासून मी समग्र महाराष्ट्राला एक इन्स्टिट्यूशन म्हणून अनुभवत आलोय. गेल्या काही वर्षांमध्ये मात्र महाराष्ट्राची घसरण ही बलाढ्य 'इन्स्टिट्यूशन'पासून कमजोर 'ऑर्गनायझेशन'कडे होते आहे की काय असे वाटू लागले आहे. म्हटलं तर या दोन्ही संज्ञा 'संस्थात्मक विकास' (Organisational Development) या संस्थात्मक उभारणीच्या विशेष क्षेत्रातील आहेत परंतु त्या महाराष्ट्राच्या वाटचालीला लागू होऊ शकतात. 'इन्स्टिट्यूशन' ही प्रगल्भतेच्या प्रत्येक परीमाणावर अधिकाधिक अस्सल ठरत नि वाढत जाते. तिचे सारे सदस्य (Stakeholders) हे समता, बंधुता, न्याय, शांती, सहकार, संपन्नता, बौद्धिक सामर्थ्य इ. तत्वांवर एकमेकांशी प्रतिबद्ध होत भावनिक एकजिनसीपणाने तिला चौफेर पद्धतीने अधिकाधिक प्रगत करीत जातात. 'ऑर्गनायझेशन' मधील सदस्य मात्र आपापल्या व्यक्तीगत मतलबासाठी करारपद्धतीने व यांत्रिकपणे काही ठरलेल्या टार्गेट्सवर काम करीत असतात. यांना आपल्या संस्थेबद्दल आत्मीयता नसते. सामूहिक ध्येयासाठीची आसक्ती नसते. इन्स्टिट्यूशन आणि ऑर्गनायझेशन मधील फरक स्पष्ट होण्यासाठी शिवरायांचे स्वराज्यप्रेमी मावळे आणि आदिलशाहीचे पगारी सैनिक यांची तुलना करा.

कोणतेही राज्य, देश अथवा राष्ट्र हे चारही पातळ्यांवर कार्यकुशल असावे लागते, जसे की आर्थिक (उद्योजकीय) भरभराट, बौद्धिक क्षमतेतील व कामगिरीतील वाढ, सांस्कृतिक प्रगल्भता व आनंद आणि सामाजिक साहचर्य व संवेदनशीलता. या चारही पातळ्यांवर आज महाराष्ट्र गोंधळलेला, कोमेजलेला आणि म्हणून मंदावलेला दिसतोय. देशाला बौद्धिक अथवा वैचारिक नेतृत्व देणारा महाराष्ट्र आज अवैज्ञानिक, अनैतिक, असामाजिक, असत्य व अंधश्रद्ध टिप्पण्यांवर नीटपणे प्रहार करताना दिसत नाहीय. टाटा, बिर्ला, किर्लोस्कर, बजाज, गरवारे इ. दिग्गज उद्योगपतींच्या सामाजिक जाणिवा या महाराष्ट्राने समृद्ध केल्या. आज मात्र त्याच महाराष्ट्रीय उद्योजकतेच्या वारशांसमोर काही 'सुमार उद्योगपतींच्या बेसुमार उदाहरणां'चे आव्हान उभे केले जात आहे. भ्रष्ट भांडवलशाही आणि अनुत्पादक साम्यवादाला टाळून आर्थिक - सामाजिक - उद्योजकीय अशा सर्वस्पर्शी यशाचा सहकारी ढाचा महाराष्ट्राने कार्यान्वित करून दाखवला. त्या महाराष्ट्राला आज काही उपटसुंभ 'आर्थिक संपन्नता व सामाजिक प्रगल्भते'वर ज्ञान देताना पाहून वाईट वाटते. धनंजयराव गाडगीळ, पंजाबराव देशमुख, चिंतामणराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील इ. ज्ञाननायकांचा महाराष्ट्र आज छद्मनायकांसमोर हतबल होताना दिसतोय.

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा, बौद्धिक उपक्रमशीलता व सामाजिक न्यायाच्या अस्सल जाणिवा या महाराष्ट्रीय बहुजनांच्या कर्मकुशलतेचा परीपाक आहेत, हे येथील बहुतांश अभिजनांनाही मान्य व्हावे. किंबहुना येथील सामाजिक व बौद्धिक बंडखोरीच्या क्षेत्रात काही दिग्गज अभिजनांनी जे बहुमूल्य काम केले आहे त्याचा प्रेरणास्रोत हा बहुजनी आहे. मऱ्हाटीचा प्राकृत जोरकसपणा, शेतीक्षेत्रातील उपक्रमशीलतेचे 'बळीराजा' व 'निऋती' हे संदर्भ आणि कुळांचा व गणांचा ग्रामीण - सांस्कृतिक तजेलदारपणा इ. गोष्टी येथील मरहट्ट मातीची अंगभूत वैशिष्ट्ये आहेत. हर हर महादेव हा विजयघोष येथील विजिगीषूवृत्तीचे सामूहिक प्रकटन आहे. अशा सतत विजयोत्सुक असणाऱ्या महाराष्ट्रात आज देशपातळीवरील वैचारिक नेतृत्व देण्याबाबतीतली मरगळ का दिसते आहे? हां, सन १९४७ पासून आजपर्यंत एकही 'मऱ्हाटी' माणूस हा भारताचा प्रधानमंत्री होऊ शकला नाही, ही येथील 'मराठी सात्विकतेच्या राजकीय अतिरेका'चा परिणाम आहे, असे मी समजतो. परंतु या सात्विक राजकीय संस्कृतीला आज काही अगम्य घटकांच्या कुटीलतेचे ग्रहण लागले आहे की काय, असा निष्कर्ष काढण्याची बला येऊन ठेपली आहे. आमचा राजकीय अभिनिवेश हा नेहमीच 'प्रबुद्ध' राहिलेला आहे. या प्रबुद्धातला बुद्ध हल्ली हरवत चालल्याचे जाणवते आहे.

महाराष्ट्रात एक वेगळ्याच प्रकारचा बौद्धिक आणि सांस्कृतिक असा सामूदायिक न्यूनगंड निर्माण होतोय का? हा न्यूनगंड हेतूपुरस्सरपणे वाढवला जातोय का? आम्हाला हल्ली अपरिपक्व संहिता चालविणाऱ्यांकडून जगण्याचे धडे घ्यावे लागताहेत का? आमच्या तर्कशास्त्रीय बळाला आणि मानवीय विवेकाला तडे जाताहेत का? अस्सल पराक्रमाची जागा नक्कल दिखाऊगिरी घेते आहे का? आमचा बाणेदारपणा (जो भल्याभल्या इतरेजनांना प्रसंगी झेलायला अवघड व्हायचा!) यथावकाश लोप पावतोय का? – हां, हे प्रश्न माझ्या कोणत्याही अस्थायी किंवा असत्य विश्लेषणातून निर्माण झालेले नाहीत. सार्वजनिक चर्चांची ढोबळ चिकित्सा जरी तुम्ही केलीत तरी ढासळणारा स्तर हा चौफेर जाणवेल. सर्व वयोगटातील बहुतांश महाराष्ट्रीय मंडळींमध्ये एक अस्वस्थता अशीही आहे की महाराष्ट्र बदलतोय तो चुकीच्या दिशेने. मी गेले काही दिवस महाराष्ट्रभर फिरून विविध क्षेत्रातील व स्तरांवरील लोकांशी संवाद साधतोय. भाबडेपणामुळे बहुतेक लोक आपल्या अस्वस्थतेची नीटपणे कारणमिमांसा करू शकत नाहीत. ही अस्वस्थता उद्योजकीय, आर्थिक, बौद्धिक, सांस्कृतिक व सामाजिक अशा सर्व प्रकारची आहे. एक सामुदायिक नि प्रखर शल्य हे ही जाणवते आहे की आम्ही आमची सामूहिक प्रज्ञा कुठेतरी गहाण ठेवू लागलो आहोत का?

कोणत्याही 'इन्स्टिट्यूशन'चे प्रथम स्खलन हे बौद्धिक स्तरावर होत असते. इन्स्टिट्यूशनकडून ऑर्गनायझेशनकडे जाणारी उतरंड ही मेंदूच्या असत्य उपयोजनावर बेतलेली असते. अशी असत्यता ही काही कावेबाज मंडळी छद्मी कपटाने आस्तेकदम बौद्धिक क्षेत्रात पेरत असतात. बाराव्या शतकातील संत बसवण्णा, सतराव्या शतकातील संत तुकाराम, एकोणिसाव्या शतकातील जोतिबा, नंतरचे आगरकर, विसाव्या शतकातील बाबासाहेब आणि शाहू महाराज, या दिग्गजांनी त्या त्या वेळचा हा बौद्धिक छद्मीपणा ओळखून त्याचा तत्कालीन बंदोबस्तही केला होता. आर्थिक, बौद्धिक, सांस्कृतिक व सामाजिक परीमाणांवर शिवरायांनी असे भलेथोरले देदिप्यमान आयाम घालून दिलेले आहेत की आम्हा मराठीजनांना आजही अन्यत्र मार्गदर्शनासाठी पहावे लागत नाही. नीतीशास्त्राचे धडे शिवरायांच्या स्वराज्याचा अभ्यास करताना सहजच मिळत जातात. एवढा प्रचंड मोठा उत्तम गव्हर्नंसचा वारसा आमच्याकडे असताना हल्ली बहुतेक क्षेत्रातील आमचे 'नायक' गोंधळून का जातात? बौद्धिक साचलेपणा एकदा घट्ट झाला की सर्वच क्षेत्रांत 'खुजे नायकत्व' मान्य होऊ लागते. खरी नाणी बाजारातून नाहिशी होतात नि बोगस नाण्यांचे प्राबल्य वाढू लागते. अनेक वर्षे अशी बोगसांची सद्दी चालल्याने भारतातील काही प्रांत हे सर्व दृष्टीने मागासलेले राहिले. यांच्या अर्थव्यवस्था कमालीच्या कमजोर झाल्याने देशातील महाराष्ट्रासारख्या अन्य मजबूत प्रांतांना यांना प्रत्यक्ष – अप्रत्यक्षरित्या पोसावे लागले. अशा प्रकारच्या सार्वजनिक स्खलनाचा संसर्ग एकदा जडला की तो आवरणे खूप अवघड होऊन जाते.

गडबडलेला मेंदू आणि भांबावलेले मन हे अर्थातच सम्यक प्रगतीवर काम करत नाही. आर्थिक अनास्था, उद्योजकीय मांद्य, सांस्कृतिक आक्रस्ताळेपणा आणि सामाजिक असभ्यता इ. गोष्टी मग आपसूकच वाढत जातात. युरोपातील ज्या काही देशांच्या महान संस्कृतींचे दाखले आजपर्यंत दिले जात त्यांच्या अर्थव्यवस्थांची व राजकारणाची एकूणच पडझड आज आपण पहातो आहोत. स्खलन होत असते परंतु ते वेळीच ओळखून टाळताही येते. महाराष्ट्राला असे सार्वजनिक स्खलन टाळण्यासाठी एका सार्वत्रिक अशा वैचारिक रिनाईसंसची गरज आहे. ज्यांच्या हृदयी महाराष्ट्र वसतो त्या समस्त महाराष्ट्रीय मंडळींनी ही जबाबदारी सामूहिकरीत्या स्विकारायला हवी. अर्थात याची सुरुवात आमच्या घरून व्हायला हवी. आम्ही स्वतःलाच तीन मुलभूत प्रश्न विचारायला हवेत, आमच्या व्यक्तीगत जीवनातील व्यावहारिक तडजोडी आणि आमच्या सामूहिक अस्मितांदरम्यान आम्ही लबाडी करतो आहोत काय? खुज्या राजकारण्यांचा आम्ही प्रभाव स्विकारायचा की त्यांना बदलण्याचा आम्ही सामूहिक प्रयत्न करायचा? श्रद्धांच्या नावाखाली अंधश्रद्धांना आणि विवेकाऐवजी बदमाश वर्तनाला आम्ही गौरवांकित करतो आहोत का? प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाने बांडगुळांची फिकीर न करता आपले घनदाट वृक्षत्व ओळखावे आणि स्वतःच्या मुळांना अधिक घट्ट करावे!

ईमेल – girishjakhotiya@gmail.com

Copyright ©jakhotiya.com

Right to change/reproduce withheld, IPC copyright Act 1957. The article can be forwarded with author's name for public awareness.

वरील लेख भारतीय प्रताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित. लेखकाच्या नावानिशी हा लेख विविध समूहांमध्ये पाठविता येईल.

## सुविचार

*उपजे ते नाशे। नाशले पुनरपि दिसे।*
*हे घटिकायंत्र। तैसे परिभ्रमे गा।।*

**– संत ज्ञानेश्वर**

# काही टाकायचे आहे पण टाकणार नाही

♦ योगिनी पाळंदे

मधुचंद्रहून ठाण्याला घरी आल्यावरची पहिली रात्र. नाही नाही. ती..वाली रात्र नव्हे. त्या रात्रीचा पहिला स्वैपाक शेजारच्या शेगडीवर कुकर फुसफुसत होता. (कोकणस्थ) गोड-आमटी करायची गोड जबाबदारी माझ्यावर होती. मी गॅस लावायला काडेपेटी हातात घेतली मात्र, माझ्या पाठीवर एक स्पर्श झाला.

मी लाजून चूर..मनाने कायशिशी मोहरून गेले. अजूनही आमचा 'माफक रोमान्स' चालू होता ना. माझे गाल लाल व्हायला लागले. सॉरी मी गोरी नाही..सबब..माझे गाल चॉकलेटी व्हायला लागले!!

तिरपा कटाक्ष टाकून मागे बघते तो 'साक्षात सासुमा.'

'शेजारी गॅस चालू आहे ना, मग नवीन काडी कशाला पेटवली??' त्या काडीने माझ्या रोमान्सची झिंग क्षणात काडीमोल होऊन मी भानावर आले. सासूमानी मला दुसरी काडेपेटी दाखवली, 'ज्यात जळलेल्या काड्या होत्या.'

एक शेगडी पेटलेली असेल तर नवीन काडी लावायची नाही. जळलेल्या जुन्या काडीनेच पेटलेल्या शेगडीवरून विस्तव उचलायचा.

आता कुकरचा 'अतीप्रशस्त-ओबेस' देह शेगडीवर तापलेला असताना,त्याखालून जुन्याकाडीने विस्तव कसा पळवावा? मग सांडशीच्या तोंडात जुनी काडी.. 'आणि तो पलीता कुकरच्या कुल्ल्या खाली' अशी कसरत झाली.

अखेर आमटीखाली गॅस लागला. 'तोपर्यंत मी गॅसवर होते.' कारण कर-कटेवरी घेऊन सासुमा माझ्या प्रत्येक कृतीकडे डोळे बारीक करून बघत होत्या. दुसऱ्या दिवशी फुरसतीत सासुमांनी मला उभेउभे तुकडे केलेली जुनी पिवळी-पोस्टकार्ड दाखवली.

त्या लांबलांब-तुकड्यांनी ह्या शेगडीवरून त्या शेगडिवरचा अग्नी प्रज्वलित करायला सोप्पा कसा पडतो त्याचं प्रात्यक्षिक दाखवलं. हे बघ प्रत्येकवेळी नवीन काडी लावायची नाही. आम्ही काडी-काडी जोडून वाचवलेलं आहे, तेव्हा कुठे हे आजचे दिवस दिसतायत.

आज मनात येतं, नवीन पिढीची सून असती तर 'त्या एका न पेटवलेल्या काडीने तिने एव्हाना काडीमोडसुद्धा घेतला असता.' सासूमांची काडी-काडी कॉन्सेप्ट स्वैपाकघरातच नव्हे तर घरभर वावरत असे.

प्रत्येक वस्तू वापरताना आणि जुनी होऊन टाकताना त्यांची परमिशन लागे. अगदी अंतर्वस्त्रसुद्धा त्यातून सुटली नव्हती!! 'चिंधीवालीकडे अंतर्वस्त्र विकली जातात' ह्या 'ज्ञानसाक्षात्कार' मला त्यांनीच घडवला. जुने परकर, ब्लाऊझ, साड्या वगैरे मंडळींची रवानगी, कपाटातून स्वैपाकघरात होत असे. घासलेली भांडी पुसून जागच्या जागी ठेवायला, हात पुसायला आणि स्वैपाकघरातला कार्यभाग संपला की त्यांचे 'deputation' पाय पुसणे म्हणून होत असे.

आंघोळीच्या गरम पाण्यात रवी व ताकाचं भांडं धुणे. दुधाच्या पिशव्या धुवून वाळवून विकणे. 'दुधाच्या कोरड्या पिशव्यांनी तर आमच्या घरात इतिहास घडवला होता..' त्या पिशवीने काय काय पाहिलं नव्हतं? त्यात सासुमाच्या प्रभातफेरीतील 'पुष्पचौर्य-कथा' लपलेल्या असत. जास्वंदीच्या टप्पोऱ्या कळीचा उमलण्यापूर्वीचा 'कळीदार प्रवास' त्या पिशवीतून होत असे.

त्यातच देवळातल्या मैत्रिणींना वाटण्यासाठी तिळगुळ असत. दशभुजा गणपतीच्या देवळातून संकष्टीच्या प्रसादाचे मोदक त्या 'दूधपिशवीच्या पालखीतूनच' घरी येत. हनुमानजयंतीचा सुंठवडा त्यातूनच येई आणि 'रामा-शिवा-गोविंदा' ह्या मानकऱ्यांचे प्रसादसुद्धा कधी चैत्र तर कधी श्रावण महिना साधून, त्या पिशवीतून आमच्या घरी येत. त्यात कधीं सुट्टी नाणी विराजमान होतं तर एखादी 'फाटलेली पण खपवायची असलेली' दहा रुपयांची नोटही असे.

कहर म्हणजे एकदा तर बँकेच्या लॉकरमधले किडुक-मिडुक सासुमांनी त्या पिशवीतून घरी आणल्यावर मात्र मी त्यांना कोपऱ्यापासून हात जोडले होते. जी गत दुधाच्या पिशवीची तीच इतर वस्तूंची. आणि केवळ सासुमाच नव्हे तर तिच्या पिढीने हाच 'पुनर्वापरमंत्र' जपला. दिवाळीच्या वेळी वापरलेल्या मातीच्या पणत्या स्वच्छ पुसून माळ्यावरती चढत. तीच कथा कंदील किंवा चांदणीची असे. इस्त्रीची एकदा वापरलेली साडी त्याच घडीवर घडी पाडून कपाटात जायची आणि अर्थातच पुन्हा नेसली

जायची. अशा कित्येक गोष्टी!!

चहाच्या 'कानतुटक्या-अँटिक-कपमध्ये' वाटलेली हिरवी चटणी ठेवणे, क्वचित तो कप विरजणासाठी वापरणे त्याच 'क्रोकरी सेटच्या' (?) विजोड झालेल्या बश्या झाकण म्हणून वापरणे. तुटक्या प्लास्टिक बादल्यामध्ये झाडे लावणे. 'रिकाम्या डालडा-डब्यात तुळस लावण्याचे सत्कार्य ज्या कुणी सर्वप्रथम केले असेल त्याला काटकसर आणि पर्यावरणप्रेमाचे एकत्र नोबेल का बरं देऊ नये?' पूर्ण वापर झाल्याशिवाय फेकणे ह्या गुन्ह्याला त्या सर्वांच्याच राज्यात क्षमा नव्हती. फ्रीजमधे हौसेने आणून ठेवलेल्या आणि न वापरून 'एक्सपायरी डेटलेल्या' सरबताच्या, व्हिनेगरच्या बाटल्या टाकायला काढल्या की सासुमांचा तिळपापड होत असे. वापरायची नव्हती तर आणली कशाला इतकी महागातली बाटली? आम्ही नाही बाई अशा वस्तू कधी टाकल्या, एक्सपायरी डेट नसलेले 'अमर आयुर्वेदिक काढे' त्यांना भारी प्रिय.

वस्तूंचा पुनर्वापर हा शब्द कधीही न ऐकता सासूमांनी त्या कल्पनेची अम्मल बजावणी कितीतरी वर्षे आधीच केलेली होती. साधे इस्त्रीचे कपडे घरी आले तरी त्या कागदाचा बोळा न होता तो रद्दीच्या गठ्ठ्यात जाई आणि त्याला बांधलेला पांढरा दोरा गुंडाळून एका विशिष्ठ ठिकाणी ठेवलेला असे. भेटवस्तुचे चकचकीत रंगीत कागद निगुतीने घडी करून ठेवलेले असत. त्यांच्या पिढीने अश्या अनेक प्रकारे 'कचरासंवर्धन' केले. लाकूड, प्लास्टिक, काच आणि कपड्यांचेच नव्हे तर तव्यावरच्या उष्णतेचेसुद्धा रीसायकलिंग केले!!!

पोळ्या झाल्यावर त्या तापलेल्या तव्यावरच फोडणी करणे. फोडणीचे काम नसेल तर क्वचित त्या तव्याचा शेक दुधाच्या पातेल्याला देणे. वरणभात शिजल्यावर कुकर गरम असतानाचे तळातले पाणी फोडणीची-वाटी, किंवा दह्याची-वाटी वगैरे ओशट भांडी धुवायला वापरणे हे सर्वमान्य होते. 'भांड्याच्या बिळात लपलेले तूप' गरम कुकरात ठेवून पातळ करून ते पोळीला लावणे आणि शेवटी ते भांडं घासायला टाकण्यापूर्वी त्यातून हात फिरवून तो ओशटपणा हाता किंवा पायाला चोळणे हे करणारी सासुमांची पिढी आता राहिली नाही. 'काय ती जुनी बोचकी सांभाळून ठेवता तुम्ही? सगळं फेकून द्या' हे वाक्य त्या पिढीला आमच्या पिढीकडून अनेकदा ऐकायला लागलं असेल. आणि त्या मंडळींनीही नव्या संसारात आमच्या वस्तूंची अडगळ नको म्हणून गपचुप ऐकलेही असेल.

आम्हीही शौर्य दाखवून अशी अनेक प्लास्टिकची, कपड्यांची, भांड्यांची, काचेची, कागदाची बोचकी बेमुर्वतखोरपणाने फेकली आहेत. जुन्या वस्तू फेकून देऊन नव्या आणणे ह्याला मुळीच डोकं नाही लागत, लागते ती फक्त मस्ती आणि बेफिकिरी! पण वस्तू, तिच्या शेवटच्या श्वासापर्यंत वापरायला बुध्दी आणि मन ह्या पलीकडेही जाऊन एक पर्यावरण प्रेम लागतं, ज्याचा उल्लेख त्या पिढीने कधी केला नसेल, पण त्या विचाराचं आचरण मात्र आवर्जून केलं.

ती पिढी जगलीही तशीच आणि गेलीही तशीच 'शरीराच्या प्रत्येक अवयवाचा पूर्ण वापर करून ते जीर्ण शिर्ण झाल्याशिवाय त्या पिढीतल्या कुणी मरणही पाहिले नाही.' सासुमासुद्धा अठ्ठाईशी वर्षे परिपूर्ण जगून मग गेल्या. आज निसर्गाचा, सृष्टीचा पोएटिक जस्टिस लावायला बसलं तर आमच्या पिढीला आणि आमच्या पुढच्या पिढीला निसर्ग पूर्ण जगून नाहीं देणार.

आम्ही न वापरता फेकलेल्या, आणि अकाली टाकलेल्या वस्तुंसारखाच आमच्याही शरीराचा आणि आयुष्याचाही अकाली शेवट होईल आणि 'आम्हीच ह्या पृथ्वीतलावर तयार केलेल्या, टाकलेल्या वस्तूंच्या कचऱ्यात विलीन होईल' असं वाटत राहातं.♦

# सुभाषित – रत्न – हार

**जले तैलं खले गुह्यं पात्रे दानं मनागपि।**

प्राज्ञे शास्त्रं स्वयं याति विस्तारं वस्तुशक्तितः।।

अर्थ – पाण्यात तेल टाकले तर ते पाण्याच्या पृष्ठभागावर विस्तारत (पसरत) जाते, दुष्ट मनुष्याला गुप्त गोष्ट सांगितली तरी तिचा चारचौघांत बोभाटा (म्हणजेच विस्तारच) होतो, दान थोडे असले तरी योग्य माणसास दिल्यास त्याची प्रसिद्धी होते, आणि बुद्धिमान माणसास ज्ञान मिळाले असता, तो ते ज्ञान चार-चौघांना वाटून, त्याचा विस्तारच करतो.

त्या त्या वस्तूंच्या ठिकाणी असलेल्या सामर्थ्याचा हा परिणाम होय.

**यथा गजपतिः श्रान्तः छायार्थी वृक्षं आश्रितः।**
**विश्रस्य तं द्रुमं हन्ति तथा नीचः स्वं आश्रयम्।।**

**अर्थ–** ज्याप्रमाणे एखादा मोठा हत्ती थकल्यानंतर छायेसाठी व विश्रांतीसाठी एखाद्या वृक्षाच्या आश्रयाला जातो, मात्र विश्रांती घेऊन झाल्यानंतर तो वृक्षच मोडून टाकतो! त्याप्रमाणे नीच वृत्तीचा मनुष्य, काम झाल्यावर, आपल्या आश्रयस्थानाचा नाश करीत असतो!

आई-वडील व वडिलोपार्जित संपत्ती याबद्दल अत्यंत बेदकारपणे वागणारे लोक काय थोडथोडके आहेत?

♦

# इच्छापत्र : अपरिहार्य पण दुर्लक्षित दस्तावेज

• श्रीनिवास मराठे (पृ.३९२), दादर, मुंबई भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

**प्रोबेट (संप्रमाण):**

१. इच्छापत्र आणि त्यासमवेत असलेल्या पुरवणी इच्छापत्राच्या सत्यासत्यतेविषयी खात्री करून घेतल्यावर Testamentary Court प्रोबेट जारी करते. म्हणून इच्छापत्राची नोंदणी करून घेणे हा प्रोबेटसाठी पर्याय ठरू शकत नाही. वारसाहक्काचा प्रश्न आला तर बँका, सरकारी कार्यालये, बहुतांश कंपन्या, आर्थिक क्षेत्रातील इतर संस्था इत्यादी प्रोबेट ची मागणी करतात.

२. भारतीय वारसाहक्क कायदा १९२५ अन्वये 'सक्षम न्यायालयाने आपल्या शिक्क्यासहित सत्यापित केलेली इच्छापत्राची प्रत ज्याअन्वये त्याच्या कर्त्याच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास अनुमती मिळते असे कागदपत्र म्हणजे प्रोबेट. त्यामुळे इच्छापत्र आणि त्याचे अस्तित्व या दोन्हीच्या अधिकृत असण्यावर शिक्कामोर्तब होते.

३. प्रोबेट पिटीशन दाखल केल्यापासून, जर त्यावर आक्षेप दाखल होऊन ते दाव्यात परावर्तीत झाले नाही, तर केवळ ८ ते १० महिन्यांच्या कालावधीत प्रोबेट जारी होण्याची प्रक्रिया पार पडू शकते. सर्वसामान्यपणे व्यावसायिक व्यवस्थापकांची फी जास्त असल्याने बहुतेक वेळा ओळखीतील विश्वासू व्यक्तीच व्यवस्थापक असते व ती प्रोबेटचे पिटीशन दाखल करते.

४. हिंदू, जैन, बौद्ध आणि शीख कर्ता असल्यास आणि (पूर्वीच्या) मुंबई, मद्रास आणि कोलकाता इलाक्यात इच्छापत्र लिहिले गेले असल्यास किंवा त्यात वाटणी करण्यायोग्य स्वकष्टार्जित स्थावर मालमत्ता असल्यास प्रोबेट घेणे अनिवार्य आहे. हे प्रावधान ख्रिश्चन व्यक्तींसाठी नाही. (भारतीय वारसाहक्क कायदा १९२५ - कलमे २१८ ते ३६९ प्रोबेट बद्दल माहिती)

५. याच कायद्याच्या कलम २२३(२) अनुसार अवयस्क आणि मानसिक असंतुलन असलेल्या व्यक्ती प्रोबेट मिळण्यास अपात्र आहेत. तसेच व्यक्तींचा समूह (Association of Persons) प्रोबेट मिळण्यास अपात्र असला तरी एखादी कंपनी मात्र प्रोबेट मिळण्यास पात्र आहे.

६. कलम २२२ अनुसार प्रोबेटसाठी अर्ज केवळ व्यवस्थापकच किंवा न्यायालयाच्या आदेशाने व्यवस्थापक म्हणून नियुक्त व्यक्तीच करू शकेल. जर इच्छापत्रात व्यवस्थापक नेमला गेला नसेल तर न्यायालय तसा अर्ज करणाऱ्या कोणत्याही लाभार्थीला प्रोबेटऐवजी 'Letter of Administration' जारी करते. अशा व्यक्तीने इच्छापत्रातील तरतुदींप्रमाणे मालमत्तेचे वाटप करणे त्याला कायद्याद्वारे बंधनकारक असते. प्रोबेट जारी करतांना इच्छापत्राची मूळ प्रत कोर्टाकडे राहते आणि सत्यापित प्रत व त्याच्या सत्यतेचा दाखला प्रोबेट म्हणून व्यवस्थापकाला दिला जातो. मात्र इच्छापत्रच अस्तित्वात नसेल तर हयात वारसांना 'Succession Certificate' घ्यावे लागते.

७. इच्छापत्रात स्थावर मालमत्तेच्या वाटपाबाबत उल्लेख असेल तर प्रोबेट घेणे सर्वच लाभार्थींच्या हिताचं आहे. तसेच वाटपातील काही मालमत्तांबाबत संदिग्धता किंवा अस्पष्टता असल्यास देखील प्रोबेट घेणे सर्वांच्या दृष्टीने हिताचे असते.

८. न्यायालयाची फी मालमत्तेच्या मुल्यांकनाप्रमाणे असून ती महाराष्ट्रात कमाल रु. ७५,०००/- एवढी आहे. प्रोबेट संबंधातील कार्यवाही कोर्ट फी भरल्यावर सुरू होते. व्यक्तीचे हिंदू वारसाहक्क कायदा (सुधारित) २००५ प्रमाणे जे वारसदार आहेत त्यांचे वा इतर कोणाचेही आक्षेर न आल्यास किंवा आलेले आक्षेप कोर्टासमोर फेटाळले गेल्यावर प्रोबेट जारी होते.

९. जर इच्छापत्र अवैध ठरले तर न्यायालय प्रोबेट जारी करू शकत नाही. अशा परिस्थितीत व्यक्तीच्या धर्माधारित वारसाहक्क कायद्यानुसार मालमत्तेचे वाटप होते.

१०. विनाइच्छापत्र मृत किंवा इच्छापत्र अवैध ठरलेल्या हिंदू व्यक्तींच्या बाबतीत वर उल्लेखलेल्या चार पैकी एकही प्रकारचे वारस अस्तित्वात नसतील तर मालमत्ता सरकार जमा होते. इतर धर्मियांच्या बाबतीतही हे लागू परंतु तेथे वारसांचे विविध प्रकार नसतात. या कारणाने हिंदू व्यक्तीने आपल्या इच्छापत्रात, विशेषतः एखादी मालमत्ता जर वारसांव्यतिरिक्त कोणास दान म्हणून दिली असेल तर, आपल्या वरील चारपैकी ज्या वर्गातील हयात वारस आहेत त्यांची नावे (किमान एकतरी नाव) लिहिणे सामंजस्याचे ठरते. परिशिष्ट २ मध्ये या चारही वर्गातील वारसांची सूची दिली

आहे. **संदर्भासाठी लिंक पहा:**
https://www.livemint.com/Money/vcvcYkJ6aFWKWahwjaaJcN/Court-fee-to-obtain-probate-in-Maharashtra-is-up-to-75000.html
https://indiacode.nic.in/handle/123456789/2385?locale=en

**प्रोबेटसाठीची प्रक्रिया:**

१. अर्जदाराने (व्यवस्थापकाने) विहित मसुद्याप्रमाणे अर्ज उच्च न्यायालयाच्या अखत्यारीतील testamentary कोर्टात दाखल करावा. (उच्चन्यायालय नसल्यास जिल्हा न्यायालयात).

२. या अर्जासोबत मूळ इच्छापत्र, आणि पुढील माहितीचे निवेदन देणे आवश्यक.
- कर्त्याच्या मृत्यूचा दिनांक आणि वेळ;
- सोबत इच्छापत्राची मूळ प्रत, (Codicil असल्यास त्यासह);
- इच्छापत्र स्वाक्षरित झाले आहे. (The WILL has been duly executed);
- वाटप केलेल्या मालमत्तेच्या मुल्यांकनाची कागदपत्रे व निवेदन (कोर्टाने मागितल्यास);
- स्थावर व जंगम मालमत्तेचे कागदपत्र (कोर्टाने मागितल्यास);
- अर्जदार इच्छापत्रात नमूद केलेलीच व्यक्ती असल्याचा दाखला.
- विशेषतः हिंदू व्यक्तींच्या बाबतीत कर्त्याच्या हिंदू वारसाहक्क कायदा (सुधारित) २००५ अन्वये सर्व हयात वारसदारांचे ना हरकत प्रतिज्ञापत्र.

३. काही कारणाने इच्छापत्र अवैध ठरले तर कोर्ट प्रोबेट जारी करू शकत नाही. त्या परिस्थितीत लागू असलेल्या वारसाहक्क कायद्याप्रमाणे मालमत्तेचे वाटप होऊ शकते.

**सारांश:**

विशिष्ठ व्यक्तींना मिळणाऱ्या हिश्श्यासंदर्भात विविध धर्मांच्या वारसाहक्क कायद्यांमध्ये विविध प्रावधाने आहेत. वारसांपैकी एखादा जरी समंजस नसल्याची केवळ शंका जरी असेल तरी इतर लाभार्थींच्या भल्यासाठी तरी कायद्याच्या खाचाखोचा जाणणाऱ्या वकिलाच्या सल्ल्याने बनविणे श्रेयस्कर! शिवाय व्यवस्थापक म्हणून एखाद्या ट्रस्टीकंपनीची नेमणूक केली असल्यास प्रोबेट घेण्यासाठी पिटीशन करतांना त्यांच्या वकीलाबद्दल खात्री नसल्यास लाभार्थी परस्पर सामंजस्याने आपला विश्वासू वकील नेमू शकतात!

विशेषतः हिंदू पुरुष व्यक्तींना लागू असा भारतीय इच्छापत्राचा एक मसुदा देत आहे. हा मसुदा बनवितांना कायदेशीर बाबींविषयी यथायोग्य काळजी घेतली आहे. मालमत्तेविषयी सर्व बारीकसारीक माहिती देऊ नये असेही काही वकिलांचे मत असते. ती न दिली तरी माहिती सुसंगतपणे द्यावी हे उत्तम. आधीच सांगितलेल्या कारणासाठी हा मसुदा इंग्लिश मध्येच आहे. ज्यांचा इच्छापत्र मराठीतच असावे असा आग्रह असेल ते याचं भाषांतर करून आपले इच्छापत्र लिहू शकतील. यातील Highlight केलेले मुद्दे वगळता इतर कोणत्याही मजकुरात स्वतःस योग्य वाटतील ते बदल करून कोणीही व्यक्ती आपले इच्छापत्र करू शकेल. हे तसं सोपं पण स्वतःवर बेतलं तर अवघड वाटणारं काम एकदा हाती घ्याच... कारण वेळ कधीही सांगून येत नाही!

*क्रमशः*

## सहवेदना

सौ. शुभदा रवींद्र मराठे (पृ.१७), M.A. English आणि M.A. Music ची पदवी प्राप्त.

बरीच वर्ष पालघर च्या सोनोपंत दांडेकर कॉलेजमधे इंग्लिशची प्राध्यापिका म्हणून काम केलं पण संगीत हेच जीवनाचं ध्येय असल्याने नोकरी सोडून संपूर्ण आयुष्य संगीताच्या सेवेसाठी वेचलं. जयपुर अत्रौली घराण्याच्या सुप्रसिद्ध गायिका सौ. कुमुदिनी काटदरे यांच्याकडे शास्त्रीय संगीताची तालीम घेतली. अनेक स्वरचित कार्यक्रमाद्वारे श्रोत्यांच्या मनात एक वेगळा ठसा उमटवला. शास्त्रीय, उपशास्त्रीय, सुगम संगीत, गझल, ठुमरी, टप्पा सगळ्याच विधांमध्ये त्यांचा गळा लीलया फिरत असे. मध्य प्रदेशातील मंडलेश्वर या गावातील सुश्री भारती ठाकूर यांच्या संस्थेतील ग्रामीण आदिवासी मुलांना संगीताचे धडे देण्याचं सामाजिक कार्य देखील त्या गेली अनेक वर्ष करत होत्या. संगीताबरोबरच अध्यात्मात रुची असल्याने ज्ञानेश्वरी दासबोध गीता भागवत अशा अनेक ग्रंथांचा सखोल अभ्यास असून प्रवचनांची सेवा देखील अनेक ठिकाणी केली. प.पू. नाना महाराज तराणेकर हे त्यांना सद्गुरू म्हणून लाभले. आपल्या गायनाने रसिकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या शुभदाताईंचा स्वर प्रवास थांबला दि. १६ मे २०२३ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने. आपल्या आवाजाने अजूनही सगळ्यांच्या मनात असलेल्या शुभदाताईंच्या आत्म्यास सद्गती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.



♦

# देणगीदार व वर्गणीदार सूची
## (एप्रिल २०२० ते मार्च २०२३)

**वर्गणीदार:**

*आजीव सभासदत्व रु. ५००/- :*

**(२०-२१):** सर्वश्री. अथर्व विजय, राहुल रमेश, सौरभ धनंजय (सर्व पुणे), पुरुषोत्तम वामन, पुष्कर पुरुषोत्तम, वैभव पुरुषोत्तम (सर्व कल्याण), मुकुंद माधव, कांदिवली मुंबई., सौ. मृण्मयी रिसबुड (पुणे)

**(२१-२२):** सर्वश्री. मंदार मोहन (पुणे), दिनेश नारायण विदवांस (मुंबई), सौ. आरती मंदार (पुणे), प्रतिभा महेश्वर सोहोनी (अंधेरी, मुंबई), स्मिता सुधाकर जोशी (बोरिवली, मुंबई), मनीषा संजय (डोंबिवली), पुष्पा एस. डोंगरे (औरंगाबाद), मीनाक्षी यशवंत थत्ते (पुणे), पद्मजा अशोक करंदीकर (औरंगाबाद), रजनी राजीव काणे (ॲरिझोना, अमेरिका)

**(२२-२३):** सर्वश्री. सागर शरच्चंद्र विदवांस (कल्याण), सुयश विश्वास (कांदिवली), नितीन व्ही. (पुणे), स्वप्नील (पुणे), वसंत (पुणे), अमोल माधव (पुणे), जयेश माधव (पुणे), योगेश वसंत (पुणे), मोरेश्वर चिंतामणी (बोरिवली, मुंबई). सर्व सौ. सोनाली राहुल (कल्याण), अश्विनी राहुल (पुणे), दीपलक्ष्मी अभ्यंकर (पुणे), अर्चना आर. (पुणे), शिल्पा जीतेंद्र जोशी (पुणे), कु. प्राची हेमंत (नालासोपारा).

*हितचिंतक सभासदत्व: रु. ५०००/-*

**(२०-२१):** श्रीराम सुशीलकुमार (अहमदाबाद)

*हितगुज सभासदत्व: रु. २,०००/-*

**(२०-२१):** पुष्कर पुरुषोत्तम (कल्याण), मुकुंद माधव (कांदीवली, मुंबई),

**(२२-२३):** मोरेश्वर चिंतामणी (बोरिवली, मुंबई)

**देणगीदार:**

*शिक्षण निधी देणगी:*

**(२०-२१):** सर्वश्री. नागेश नारायण (पुणे) रु. ५०००/-

**(२१-२२):** श्रीराम काशीनाथ (गोवा) रु. १००१/-, सौ. रजनी राजीव काणे (ॲरिझोना, अमेरिका) रु. १०६११/-.

*वैद्यकीय मदत निधी:*

**(२०-२१):** सर्वश्री. दत्तात्रेय कृष्णाजी (DK), पुणे, रु. २५००/- अशोक लक्ष्मण (डोंबिवली) रु. १०००/-

*हितगुज निधी देणगी:*

**(२०-२१):** श्री. मोरेश्वर लक्ष्मण (सांगली) रु. ५००/-

**(२१-२२):** मोरेश्वर लक्ष्मण, (सांगली) रु. ५००/-

*कुलवृत्तांत निधी देणगी:*

श्री. मधुसूदन रामचंद्र खांबेटे (ठाणे) रु. ५०००/-

*वर्धापन दिनाप्रीत्यर्थ देणगी:*

**(२२-२३):** सर्वश्री. गजानन चिंतामणी (पुणे) रु. ५००/, मोहन एम. (पुणे), रु. ५०१/-, अरुण दत्तात्रेय (पुणे), रु. २००/-, अनिल गोविंद (पुणे) रु. १००/-, नागेश नारायण (पुणे), रु. २०००/- जीतेंद्र जोशी (पुणे), रु. २००१/-. सर्व सौ. प्राजक्ता आर. कुलकर्णी (पुणे) रु. ५०१/-, हेमांगी जोशी (पुणे) रु. ५००/-, सर्व श्रीमती. आशाताई (पुणे), रु. ५००/, शुभदा शंकर (पुणे), रु. ५००/-, सुनीता मराठे, (पुणे), रु. ५१/-

*वाढदिवसाप्रीत्यर्थ देणगी:*

**(२०-२१):** सर्वश्री. विजय विष्णू (पुणे) रु. ५००/-, आनंद यशवंत (ठाणे), रु. १५००/-,

**(२२-२३):** सर्वश्री. विजय विष्णू (पुणे) रु. ५००/-, शैलेन्द्र भास्कर (दहिसर) रु. ५००/-, सौ. अंजली विजय (पुणे) रु. ५००/-, सौ. मानसी गाडगीळ, (पुणे) रु. ५००/-,

*अन्य कारणासाठी देणगी:*

**(२०-२१):** श्री. विजय विष्णु (पुणे) विवाह वर्धापन दिनानिमित्त रु. १०००/-,

**(२१-२२):** श्री. अरविंद गोपाळ खांबेटे (पनवेल) रु. ५०००/- आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ.

**(२२-२३):** सौ. अरुण दत्तात्रेय (पुणे) रु. ५००/- AGM साठी. श्री. विजय विष्णु (पुणे) आजोबांच्या स्मृतीप्रीत्यर्थ.

♦

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ५ वी आणि इयत्ता ८ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता ५ वी, रु. २००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/–
इयत्ता ८वी – रु. ३००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/–

२) इयत्ता १० वी – ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/– ९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/–

३) इयत्ता १२ वी –
आर्टस्/कॉमर्स :
७०% ते ८०%– रु. ७००/–
८०% ते ९०%– रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सायन्स : ८०% ते ९०% – रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/–

४) पदवी – B.A., B.Com. B.Sc.,
सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/–

५) पदव्युत्तर –M. A., M.Com., M.Sc.
प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/–
C.A., L.L.B., Enginear, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/–

६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय)
राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५००/–

याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/– तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम – रु. १००/–
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम – रु. ५००/–
- (लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.)
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत (कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ). दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

यशस्वी व पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांनी दि. १ सप्टेंबर २०२३ पर्यंत आपापल्या गुणपत्रिकांची प्रत 'मराठे प्रतिष्ठान'च्या पत्त्यावर पोस्टाने अथवा info@marathepratishthan.org या ई–मेलवर पाठवावी. विजेत्यांची सूची या वर्षीच्या वार्षिक अहवालात प्रसिद्ध करण्यात येईल. तरी निकाल प्राप्त झाल्यावर लगेचच गुणपत्रिका पाठवाव्यात ही विनंती.

निकाल उशिरा लागले तर वरील मुदतीनंतर देखील गुणपत्रिका पाठविल्यास पारितोषिकांसाठी विचार होऊ शकेल. मात्र त्या परिस्थितीत प्रथम क्रमांकासाठीची पुरस्कृत पारितोषिके देणे शक्य होणार नाही. ऑगस्ट/सप्टेंबर २०२३ मध्ये होणाऱ्या या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारितोषिकांचे वितरण करण्यात येईल त्यामुळे त्याच्या १० दिवस अगोदर पर्यंत येणाऱ्या गुणपत्रिकांचाच विचार पारितोषिकासाठी होऊ शकेल याची कृपया नोंद घ्यावी.

**ई–मेल : info@marathepratishthan.org**

# : अत्यंत कळकळीची विनंती :

प्रतिष्ठानला देय शुल्क अथवा देणगी आपण IDBI बँकेच्या कोठल्याही शाखेत जाऊन, 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने IDBI बँक, दादर-प, या शाखेतील बचत खाते क्र. ०५०११०४०००४३५१९ मध्ये रोख किंवा चेकने भरू शकता.

वरील खाते क्र. १६ आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहिणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते किंवा आपल्या खात्यात परत येऊ शकते.

अशा प्रकारे रक्कम प्रतिष्ठानच्या खात्यात जमा केल्यावर आपले नाव, पूर्ण पत्ता, रक्कम व ती भरल्याचा दिनांक, चेक/NEFT/IMPS/ मोबाईल बँकिंग द्वारे दिली असल्यास त्याचा नंबर/संदर्भ क्र. तसेच ज्या कारणाने रक्कम भरली ते कारण आदी माहिती admin@marathepratishthan.org या ई-मेल वर अवश्य कळवावी म्हणजे पावती देणे सोपे होईल.

## नांदा सौख्यभरे



मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. हेमंत अरुण मराठे (पृ.२१) नालासोपारा यांची उच्चविद्याविभूषित सुकन्या चि. सौ. कां. प्राची हिचा विवाह अभियंता श्री. आदित्य जोग यांचे बरोबर मंगळवार दि. ९ मे २०२३ला १२ वा. ३० मिनिटांनी ज्वेल बॅंक्वेट क्लबवन, ग्लोबल सिटी, विरार (पश्चिम) येथे थाटामाटात संपन्न झाला.

वधु-वरांना शुभाशिर्वाद द्यायला मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. विजय मराठे पत्नी अंजलीसह उपस्थित होते. त्याचप्रमाणे मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे, भूतपूर्व अध्यक्ष आणि विश्वस्त श्री. आनंदराव मराठे, डी.के. मराठे, संपादिका डॉ. सौ. सुमेधाताई, सर्वश्री प्रभाकर, श्रीनिवास, सौ. मंजिरीताई इ. कुलबांधव-भगिनी उपस्थित होते.

मराठे प्रतिष्ठान द्वारा सौ. कां. प्राची आणि श्री. आदित्य या नवदाम्पत्याला खूप खूप शुभेच्छा आणि शुभाशिर्वाद. उभयतांचे वैवाहिक जीवन सुखासमाधानाचे जावो.

**पत्रव्यवहाराचा पत्ता** : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**